
REGISTERED No. B. 3434

किर्लोस्कर
सेंट्रिफ्युगल
पंप



किर्लोस्कर बंधु लिमिटेड. किर्लोस्करवाडी

# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख २ मार्च, १९४९ अंक १

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

**ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.**

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादिसाठीं चौकशी कराः—

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५१९

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज्
(ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)

(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
(ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु.)

(३) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
(ले:—आर. एम. तळपदे, किं. १२ आ.)

**दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.**

हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

एकूण खेळतें भांडवल : ३,६०,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : १२,००,०००रु वर

★ बँक स्ट्रीटवर ★

३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत

स्थानिक शाखा : १ दादर, २ गिरगांव, ३ सँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शीव, ७ विलेपार्ले.

इतर शाखा : ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ कडाक टाऊन (सी. पी.), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव (पंजाब), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर (पुणें), ४६ शहापूर (बेळगांव) ४७ नामपूर (नाशिक).

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

भागीदारांची संख्या २,२०० वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

डी. एन. गांडेकर,
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
(बुधवार चौक)

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

डागर यांच्या बालामृतानें

बेडेकर लोणचीं



## सर्व प्रसिद्ध माल

किर्लोस्कर कारखान्यानें तयार केलेले सरकारमान्य लेथ्स वगैरे विविध यंत्रें.

**प्रमुख प्रसारकः—**

**केळकर बंधु,** बुधवार चौक, पुणें २.

**केळकर बंधु, ( शाखा )** मेनरोड, नाशिक.

( आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो. )


### मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक

**१९४९–५० मधील अंदाजी उत्पन्न–खर्च**

| | कोटी रु. |
|---|---|
| अंदाजी उत्पन्न | ३०७.४४ |
| अंदाजी खर्च | ३२२.५३ |
| अंदाजी तूट | १४.७९ |

तूट भरून काढण्यासाठी नवे कर सुचविण्यांत आले आहेत. कार्डेपाकिटांच्या किंमतींत वाढ, साखर–गिरणीकापड–टायर्स ह्यांवरील जकातींत वाढ, सुपारी करांत वाढ, पेट्रोलवर करवाढ, चैनीच्या वस्तूंवर जादा आयात कर, इत्यादि उत्पन्नवाढीचे मार्ग अवलंबण्यांत येणार आहेत. देशांत भांडवलाच्या संचयास प्रोत्साहन मिळावें, आर्थिक प्रगतीस आडकाठी येऊं नये आणि औद्योगिक व सरकारी रोख्यांकडे जनतेच्या बचतीचा ओघ वळवा ह्या दृष्टीनें प्राप्तीवरील व इतर कांहीं करांत सवलती देण्यांत येणार आहेत.

### नवीन कर-वाढ; जुन्यांत फेरबदल

( १ ) भांडवली फायद्यावरील कर रद्द करणें.

( २ ) दहा हजार रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावरील करांत ३ पै सूट.

( ३ ) अर्जित उत्पन्नावरील प्राप्तीचा कर व सुपर टॅक्स यांचा कमाल दर रुपयांत १४ आणे राहील. अर्जित उत्पन्नावरील सुपर-टॅक्सच्या दरांतील कमाल मर्यादेंत ६ पैनें आकार कमी करण्यांत येईल.

( ४ ) गळिताचीं धान्यें व वनस्पती यांवरील निर्यात कर रद्द.

( ५ ) विमानांच्या पेट्रोलवरील करांत रिबेट.

( ६ ) पाकिटाचा दर दीड आण्यावरून दोन आणे आणि पोस्ट कार्डाचा दर दोन पैशावरून तीन पैसे.

( ७ ) कृत्रिम रेशीम व रेशमी दोरा, चिनी मातीचीं भांडीं, यावरील सरचार्ज दुप्पट. वृत्तपत्रीय व स्टेशनरी कागद यांव्यतिरिक्त लागणारा कागद, कांचेचा माल, कटलरी, लोखंडी सामान, फ्लॅश-लाईट्स, फोटोग्राफचें सामान व घड्याळें यांवरील करामध्यें वाढ.

( ८ ) साखरेवरील दर हंड्रेडवेटवर एक्साईज ३ रु. ऐवजीं ३ रु. १२ आ.

( ९ ) मोटर स्पिरिटवरील एक्साईज कर १२ आण्यांवरून १५ आणे.

( १० ) सुपारीवरील आयात कर-दर पौंडी ५ आण्यांवरून ७॥ आणे.

( ११ ) तलम कापडावर एक्साईज कर साडेसहा टक्के आणि मध्यम व जाड्या-भरड्या कापडावर अर्धा आणा.

( १२ ) २५ हजार किंवा त्यापेक्षां कमी उत्पन्नाच्या कंपन्यांना प्राप्तीवरील करांत निम्मी सवलत दिली आहे, त्याऐवजीं कॉर्पोरेशन टॅक्समध्यें सवलत.

( १३ ) मोटार टायर्सवरील जकात १५ टक्क्यावरून ३० टक्के.

---

### मुंबई प्रांताचें अंदाजपत्रक

( आकडे लक्ष रुपयांचे )

| वर्ष | उत्पन्न | खर्च | वाढावा | तूट |
|---|---|---|---|---|
| १९४७–४८ (प्रत्यक्ष) | ४३,७२.८२ | ४१,३२.७० | २,४०.१२ | — |
| १९४८–४९ (दुरुस्त) | ५०,९३.९७ | ५१,९०.४४ | — | ९७.४७ |
| १९४९–५० (अंदाज) | ४८,८०.७६ | ५२,४०.७४ | — | ३,९८.४८ |

### नवे कर

१९४९–५० मधील सुमारें ४ कोटींची ही तूट भरून काढून वरती आणखी ११½ लक्ष रु. वाढावा निर्माण करण्यासाठीं, म्हणजे उत्पन्नांत ४ कोटी, १० लक्ष रुपयांची भर घालण्यासाठीं, अर्थमंत्र्यांनीं कर-वाढ सुचविली आहे, ती खालील प्रमाणें:—

| कर | अपेक्षित उत्पन्न (रु.) कोटी | लक्ष |
|---|---|---|
| ( १ ) प्रांताबाहेर जाणाऱ्या मालावर विक्रीकर | २ | ७२ |
| ( २ ) विक्रीकर माफ मालाच्या यादींत छाटाछाट | ० | ३० |
| ( ३ ) यादींत वाढ | ० | २० |
| ( ४ ) सोन्याचांदीच्या व्यवहारावर स्टॅंपड्यूटी | ० | १५ |
| ( ५ ) औद्योगिक व उजेड-वाऱ्या-व्यतिरिक्त इतर उपयोगाच्या विजेवर २ युनिटास १ पैसा कर | ० | ६० |
| ( ६ ) वर्तमानपत्रांच्या जाहिरातींच्या उत्पन्नावर ६¼% कर. | ० | १० |

### महाराष्ट्र मार्केटिंग परिषद

बॉंबे प्रॉ. को. मार्केटिंग सोसायटी लि. तर्फे पुणें येथें ता २०–१०–४८ रोजीं महाराष्ट्र प्रादेशिक परिषद प्रिं. द. गो. कर्वे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सोसायटीचे उपाध्यक्ष श्री. बी. एस. दावके ह्यांचें स्वागतपर भाषण, अर्थ व सहकार मंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचें उद्‌घाटनाचें भाषण व प्रिं. कर्वे ह्यांचें अध्यक्षीय भाषण, ह्यांचा गोषवारा व परिषदेनें मंजूर केलेले ठराव हीं एकत्र करून प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत. ह्या पुस्तिकेची छपाई, आकार, इत्यादि आकर्षक असून परिषदेच्या कार्याची कल्पना तिचेवरून उत्कृष्टपणें येते.

---

### श्री. पारखे ह्यांची जपानला भेट

पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि. चे मॅनेजिंग एजंट श्री. बाबूराव पारखे हे गुरुवार ता. १७ फेब्रुवारी रोजीं मुंबईहून जपानला जाण्यासाठीं निघाले. तेथें यंत्रसामुग्री खरेदी करण्याचा त्यांचा उद्देश आहे.


## शेअर्स विकणें आहेत

कंपनीचें अधिकृत भांडवल ५ लाख रुपये असून, तें ५० रु. चा एक, याप्रमाणें दहा हजार ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलें आहे. १ ल्या वर्षी कंपनीने ३ टक्के डिव्हिडंड वाटला. तसेंच

**ठेवी स्वीकारणें आहेत.**

व्याज १ वर्षाच्या करारानें ४ टक्के
,, २ वर्षाच्या ,, ४॥ टक्के
,, ३ वर्षाच्या ,, ५ टक्के

**लिहाः—डॅंगो आयुर्वेदिक फार्मसी लि.**
नातेपुतें, ( जि. सोलापूर )

# अर्थ

बुधवार, ता. २ मार्च १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## कारभार व करभार

### प्रांतिक अर्थकारणावरील दडपण

( प्रि. द. गो. कर्वे )

‘कर व खर्च ह्याबद्दलचें सरकारी धोरण ठरवितांना अर्थमंत्र्याला राजकारणाचें दास बनावें लागतें,’ ( Finance is a hand-maiden of Politics ) असें अर्थविषयक सरकारी व्यवहारांचा अभ्यास करणाऱ्या एका ग्रंथकारानें म्हटलें आहे. मुंबईच्या अर्थ-मंत्र्यांनीं नव्या वर्षाचें जें अंदाज-पत्रक कायदेमंडळाला नुकतेंच सादर केलें आहे, त्यावरून वरील मत किती यथार्थ आहे तें दिसून येईल. चालू वर्षी उत्पन्न ४४ कोटी येईल असा अंदाज केला होता. त्यापेक्षां सहा कोटींनीं अधिक उत्पन्न जमा झालें. प्राप्तीवरील करांतून अधिक रक्कम मिळाल्यानें व विक्रीवरील करांतून अधिक उत्पन्न झाल्यानें हा वाढावा मिळालेला आहे. असें असूनही नव्या वर्षात चार कोटींवर अधीक रक्कम करवाढीनें उभी करावी लागत आहे. ह्याबद्दलची जबाबदारी प्रांताच्या आणि देशाच्या राजकारणांत ज्या घटना होत आहेत त्यांवरच आहे. अर्थकारणाला सर्वच देशांत राजकारणाचें दास बनावें लागते; आपल्या प्रांतिक सरकारांना दोन्हीं राजकारणें,—प्रांतिक व राष्ट्रीय,—आणि मध्यवर्ति सरकारचें वरचढ अर्थकारण ह्या तीन मर्यादा सांभाळून मार्ग काढावा लागतो.

### अगतिक परिस्थितीचीं उदाहरणें

प्रांताच्या ताज्या अंदाजपत्रकांत ह्या अगतिक परिस्थितीचीं अनेक उदाहरणें आहेत. पगारवाढीबद्दल मध्यवर्ति सरकारनें नेमलेल्या समितीनें सुमारें दोन वर्षांपूर्वी आपल्या सूचना केल्या. तेव्हांपासून किंमतीचें मान उतरण्याऐवजीं वाढूं लागलें, ह्याची सर्व जबाबदारी हिंदी सरकारच्या चुकीच्या, धरसोडीच्या आणि कमकुवत आर्थिक धोरणावर आहे. परंतु प्रांताचा कारभार चालविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांना मध्यवर्ति सरकारची री ओढून कनिष्ठ व मध्यम श्रेणींतील नोकर वर्गास महिना दहा रुपये अधिक महा-गाई देऊन आपलें ओझें दोन कोटींनीं वाढवावें लागत आहे. वास्तविक पगार—मंडळाच्या शिफारसींप्रमाणें ह्याहूनही अधिक महागाई द्यावी लागेल. परंतु तसें करण्यानें एक सध्यांहून पुष्कळ व बेसुमार करवाढ तरी करावी लागेल किंवा फार मोठ्या प्रमाणांत सरकारी खातीं व विभाग बंद करावे लागतील. ह्या दोन्ही गोष्टी न करण्याचीं कारणें प्रांतिक व राष्ट्रीय राजकारणांतच सांपडतील.

### विलीनिकरणामुळें होणारे आर्थिक परिणाम

खरोखर प्रांतिक तिजोरीची स्थिति अंदाजपत्रकांत चित्रित केल्याहूनही अधिक निराशाजनक होण्याचा संभव आहे. संस्थानी मुलूख आतांपर्यंत मुंबई इलाख्यांत विलीन झाला त्यामुळेंच निव्वळ चाळीस लाखांची तूट आलेली आहे. परंतु कोल्हापूर, बडोदा व सौराष्ट्र हे भाग विलीन झाले म्हणजे पुष्कळच तूट येईल असें दिसतें. विशेषतः सौराष्ट्रांत आतांपर्यंतचा कारभार बराच मागासलेला असल्यानें त्या भागांत रायज्कारभार व संवर्धक खातीं ह्याकरितां मोठ्या प्रमाणावर खर्च होईल, व त्या मानानें तेथून प्रांतिक सरकाराला मिळणारें उत्पन्न मात्र मर्यादित असेल असें अर्थमंत्र्यांनीं सांगून ठेवलें आहे. ही बाब हिंदी राजकारणाच्या फार वरच्या दर्जाच्या धोरणानुसार ठरली असल्यानें त्याची आर्थिक जबाबदारी एकट्या प्रांतिक सरकारनें उचलावी हें न्यायाचें नाहीं. पाकिस्तानांतून आलेल्या हिंदु नागरिकांबद्दलचा सर्व खर्च, आणि नवीन प्रदेश संस्थानांच्या विलीनिकरणामळें सामील झाला त्यावरील वाढाव्याचा खर्च, हा मध्यवर्ति सरकारनें सोसला पाहिजे. ह्याबद्दल प्रांतिक सरकारनें आपल्या नागरिकांचे न्याय्य हक्क राखण्याचे बाबतींत पक्षनिष्ठा आड येऊं देतां कामा नये.

### प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नाची अन्याय्य विभागणी

प्रांतिक सरकारांवर राज्यकारभार व सार्वजनिक सोयी ह्यांबद्दल सध्यां इतका बोजा पडत आहे कीं, प्राप्तीवरील करांची विभागणी सध्यां होते त्याहून अधिक पद्धतशीरपणें केल्याखेरीज प्रांताच्या नागरिकांचे न्याय्य हक्क त्यांस मिळणार नाहींत. प्रांतांना सध्यां फक्त वैयक्तिक उत्पन्नावरील कराचा अंश मिळतो. व्यापारी मंडळ्यांवरील करांत कांहींही भाग मिळत नाहीं. जोंपर्यंत शांतता राखण्याखेरीज दुसरें कोणतेंही महत्त्वाचें काम प्रांतिक सरकार करीत नसे, तेव्हां ह्या विभागणींतील अन्याय इतका स्पष्ट होत नव्हता. तरी तेव्हांही त्यावेळच्या प्रांतिक सरकारचे अधिपति गव्हर्नर, त्यांचे मध्यवर्ति कायदेमंडळांतील सरकारी आणि सरकार-नियुक्त प्रतिनिधी, ह्यांनीं उघडपणें आणि जोरदारपणें आपल्या न्याय्य मागण्या पुढें मांडल्या व थोड्या-फार प्रमाणांत त्या मिळविल्याहि.

### निकडीची परिस्थिति

मुंबई प्रांताच्या दृष्टीनें आज त्यावेळेपेक्षांही अधिक निकडीची परिस्थिति उत्पन्न झाली आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीमुळें उत्पन्न होणाऱ्या सामाजिक जबाबदाऱ्या जवळजवळ सर्वस्वीं प्रांतिक सरकारांवर पडत आहेत व त्या धंद्यांच्या उत्पन्नावरील सर्व कर मात्र मध्यवर्ति सरकार घेत आहे. घटनासभेनें जी एक तज्ज्ञ समिति ह्या कामीं नेमली होती तिनें सर्व उत्पन्नावरील करांचा सध्यांहून अधीक हिस्सा प्रांतांना द्यावा अशी शिफारस केली होती. पुन्हां येथेंही मध्यवर्ति राजकारण आड येऊन त्या समितीचा सर्व अहवालच बाजूला ठेवला गेला. प्रांताच्या सध्यांच्या सरकारनें ह्या बाबतींत निदान पूर्वीच्या ‘नोकरदारांच्या’ सरकाराइतका तरी जोर धरून ह्या अन्यायाचें वेळींच निराकरण न केलें तर प्रांतिक करांचा बोजा भरमसाट वाढत राहील. हे कर सर्वच अप्रत्यक्ष, स्वरूपाचे, म्हणजे गरिबांवर अधिक प्रमाणांत पडणारे आहेत, हें नव्या कर-वाढींतील कलमांवरून दिसून येईल. ह्या सर्व गोष्टी ध्यानांत न घेतल्या तर एकदां मंदी सुरू झाली म्हणजे सर्वच कारभार गैर-हिशेबी होऊन बसेल.

### व्यापारी खात्यांचा व्यवहार

नव्या अंदाजपत्रकांतील दुसऱ्या एका मूलभूत महत्त्वाच्या बाबीकडेही वेळींच लक्ष वेधणें जरूर आहे. घरबांधणी, वीज, दूध, वहातूक, इत्यादि व्यापारी खाता सरकार आपल्या नेहमींच्या

शासनयंत्रामार्फत चालवींत आहे. घरबांधणीचें निराळें मंडळ नुकतेंच स्थापलें आहे. परंतु हीं सर्वच खातीं निमसरकारी स्वतंत्र मंडळांमार्फत चालविण्यांत दिरंगाई झाली तर त्यांच्या कारभाराचा गैरहिशेबीपणा वाढत जाईल. किंबहुना आतां युद्धोत्तर पुनर्घटनेचें स्वतंत्र अंदाजपत्रक सर्वच बंद करण्याची वेळ आलेली आहे. भांडवल खातें व चालू उत्पन्नाचें खातें अशीं दोनच ठेवून व्यापारी व्यवहार सर्व स्वतंत्र हिशेबानें आणि चोख पद्धतीनें चालविले पाहिजेत. सध्यांची गुंतागुंत सरकारच्या चालू खात्याला व व्यापारी खात्यांना दोघांसही धोक्याची आहे. प्रांतिक सरकार सहा कोटींचें कर्ज यंदा उभारणार आहे व पुढेंही वेळोवेळीं नाणें बाजारांत सरकारला व्यवहार करावे लागतील. आजची आर्थिक परिस्थिति सरकारच्या तात्कालिक भांडवली गरजांच्या मानानें चांगलीच अनुकूल आहे. परंतु पुढील गरजा आणि व्यापारी खात्यांची चढ-उतार ध्यानांत घेतां जितक्या लवकर त्या खात्यांचा व्यवहार सरकार अलग करील तितकें चांगलें, हें स्पष्टपणें सांगितलें पाहिजे.

## मुंबई प्रांतांतील धान्यवसुलीचे भाव

### सरकारी खुलासा

१९४८ च्या सप्टेंबरमध्यें धान्यनियंत्रण पुन्हां सुरू करण्याचें जेव्हां ठरविण्यांत आलें, तेव्हां प्रांतिक पंतप्रधान व अन्नमंत्री यांची परिषद् भरली व तींत धान्याचे नियंत्रित भाव किती ठरवावे, ह्याचा विचार झाला. परिषदेंत सर्वसाधारण मत असें पडलें कीं, धान्यनियंत्रणाचें हें धोरण म्हणजे चलनवाढविरोधी कार्यक्रमाचा एक अंगभूत भाग असल्यानें अखिल देशभर ५० टक्क्यांची ही वाढ अनिष्ट असून २५ टके वाढ योग्य होईल. पण मुंबई प्रांतांत धान्याचे भाव भरमसाट वाढले होते ही विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेऊन, मुंबई प्रांतांत पूर्वीच्या नियंत्रणाच्या काळांतील भावापेक्षां धान्यवसुलीचे नवे भाव ५० टक्क्यांनीं अधिक असावे या गोष्टीस मध्य सरकारनें एक खास बाब म्हणून संमति दिली. इतर बहुतेक प्रांतांत व संस्थानांत जास्तींत जास्त २५ टके वाढीस परवानगी देण्यांत आली. धान्याचे हे नवे भाव ठरवितांना राहणीच्या मानांत झालेली वाढ व धान्योत्पादनखर्चांत झालेली वाढ इत्यादि संबंधित बाबींचाहि मध्य सरकारनें विचार केला होता. अशा प्रकारें धान्यवसुलीचे जे नवे भाव मुंबई सरकारनें ठरविले आहेत, ते ठरवितांना मध्य सरकारनें संमत केलेली जास्तींत जास्त वाढ मुंबई सरकारनें दिली आहे; आणि या प्रांतांत धान्यवसुलीचे जे भाव आहेत ते भाव इतर प्रांतांपेक्षां व संस्थानांपेक्षां बरेच अधिक आहेत.

धान्यासारख्या वस्तूस अधिक भाव दिल्यानें कारखान्यांत तयार होणाऱ्या कापडासारख्या वस्तूंचे भाव वाढतात, आणि मग अखेरीस धान्योत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसहि धान्यास अधिक भाव दिल्याचा फायदा होत नाहीं, हें बहुधा लक्षांत घेतलें जात नाहीं. धान्याचे भाव तात्पुरते वाढविले तर त्यामुळें शेतकऱ्यांचा फायदा होतो असें मानलें, तरी समाजांतील शेतमजुरांसारख्या इतर घटकांवर या भाव वाढीचा अनिष्ट परिणाम होतो. नियंत्रणाच्या कोणत्याहि धोरणानें केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे, तर शेतमजुरांसहि न्याय मिळाला पाहिजे; आणि म्हणून वाजवी भाव कोणता हें ठरवितांना मध्यवर्ती सत्तेनें सर्व समाजाच्या हिताच्या दृष्टीनेंच विचार करून तो ठरविला पाहिजे. प्रत्येक विभागाला आपणांस वाटेल त्याप्रमाणें स्थानिक वाजवी भाव ठरविण्यास परवानगी दिली, तर घोटाळा माजेल.

## हिंदी साखरेच्या धंद्याची प्रगति

| | १९३१–३२ | १९४५–४६ |
|---|---|---|
| उसाच्या लागवडीखालील क्षेत्र ( लक्ष एकर ) ......... | २९.७२ | ३८.४७ |
| सुधारलेल्या प्रतीच्या उसाखालील क्षेत्र ( लक्ष एकर ) ........ | ११.६८ | ३५.४६ |
| सुधारलेल्या प्रतीच्या उसाखालील लागवडीची टक्केवारी ...... | ३९.३० | ८३.१० |
| दर एकरीं उसाची सरासरी पैदास ( टन ) ......... ... | १४.१० | १४.०० |
| उसाचा वापर कशासाठी केला, त्याची टक्केवारी | | |
| ( अ ) साखरेसाठी ........ | ६.५० | २५.०० |
| ( ब ) गुळासाठी ........ | ६४.७० | ५२.०० |
| साखरेचें एकूण उत्पादन ( हजार टन ) | १५८ | ९४४ |
| साखरेचा खप (हजार टन) ...... | ९८२ | १०४५ |
| एकूण आयात ( हजार टन ) ... | ५३६ | नाहीं. |
| साखरेचा सरासरी उतारा | | |
| ( अ ) हिंदुस्थान ( % )...... | ८.८९ | १०.०९ |
| ( ब ) संयुक्त-प्रांत ( % )...... | ८.५९ | १०.०९ |
| ( क ) बिहार ( % )...... | ९.०६ | १०.४९ |
| साखरेचे चालू कारखाने ........ | ३१ | १४५ |

## कंपनी–कायद्यांत दुरुस्ती होणार

हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यापासून हिंद सरकारपुढें बरेच महत्त्वाचे प्रश्न एकामागून एक उपस्थित झाले. त्यांपैकी राजकीय क्षेत्रांतील प्रश्नांकडे अधिक लक्ष लागणें अपरिहार्यच होतें. अशाच प्रकारचे कांहीं प्रश्न आर्थिक क्षेत्रांतहि निर्माण झाले आहेत. नव्यानें निघणाऱ्या उद्योगधंद्यांत परकीय भांडवलाचा भाग किती असावा आणि तें परकीय भांडवल कोणत्या अटींवर स्वीकारण्यांत यावें हा प्रश्न हिंदी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नव्यानें महत्त्व पावला आहे. त्याशिवाय, कंपन्यांचे भागीदार आणि चालक ह्यांच्यांतील संबंधांचाहि विचार होणें अगत्याचें वाटूं लागलें आहे. युद्धकालांत आणि नंतरही हिंदुस्थानच्या व्यापारी हालचाली बऱ्याच प्रमाणांत वाढल्या आहेत. ह्या सर्व घडामोडी विचारांत घेऊन हिंद सरकारच्या व्यापार-खात्यानें विम्याचा कायदा आणि कंपन्यांचा कायदा ह्या दोन कायद्यांची तपासणी करण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. युद्धकालापासून हिंदुस्थानांत आर्थिक परिस्थिति झपाट्यानें बदलत गेली. ह्या बदललेल्या परिस्थितीचा विचार करून काल मानाप्रमाणें सार्वजनिक भांडवलाच्या कंपन्यांच्या कारभाराबाबत अधिक स्पष्ट अशा स्वरूपाच्या दुरुस्त्या होणें योग्यच आहे. कंपनी–कायद्यांत दुरुस्ती करणाऱ्या अशा एका बिलाचा खर्डा मार्च महिन्याच्या अखेर तयार होईल, आणि तो लोकांचें मत अजमावण्यासाठीं प्रसिद्ध करण्यांत येईल. ह्या खर्ड्यासंबंधीं जनतेचीं टीका, दुरुस्त्या, सुधारणा इत्यादि विचारांत घेऊन नंतर हिंदी पार्लमेंटच्या पावसाळी अधिवेशनांत दुरुस्तीचें बिल मांडण्यांत येईल. बिलाचा मसुदा तयार करण्यासाठीं एका खास अधिकाऱ्याची नेमणूकही करण्यांत आली आहे. बिलावरील जनतेच्या मतांचा ग्राह्यांश मसुद्यांत समाविष्ट करून, बिलाचा अखेरचा खर्डा तयार करण्यांत येणार आहे.

## औद्योगिक धोरणासंबंधीं सर एम्. विश्वेश्वर अय्या ह्यांच्या सूचना

ऑल इंडिआ मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन, मुंबई ह्या संस्थेची ९ वी वार्षिक परिषद मुंबई येथें नुकतीच होऊन गेली. त्या प्रसंगीं सुप्रसिद्ध हिंदी उद्योग तज्ज्ञ सर मोक्षगुंडम् विश्वेश्वरअय्या ह्यांनीं परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून देशांतील चालू औद्योगिक परिस्थिती-संबंधीं सरकारला कांहीं महत्त्वाच्या सूचना केल्या. त्यांचा आशय पुढें दिला आहे.

( १ ) देशांतील औद्योगिक धोरण एकसूत्री असणें जरूर आहे. त्यासाठी मध्यवर्ती सरकारचे मंत्री, प्रांतिक सरकारचे मंत्री आणि संस्थानी सरकारचे मंत्री ह्यांनीं किमान दर तीन महिन्यांनीं एकदां तरी विचारविनिमयासाठी एकत्र जमलें पाहिजे.

( २ ) आणखी दहा वर्षांनीं कोणत्या प्रकारचें सरकार अधिकारपदस्थ होईल, हें सांगतां येत नाहीं. तेव्हां, १० वर्षांनीं उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्यांत येईल अशी अकाली घोषणा करण्यानें कांहींच लाभ होण्यासारखा नाहीं. सरकारच्या सध्याच्या धोरणामुळें अस्वस्थता आणि चिंता ह्यांचें वातावरण पसरलें आहे. मंदीचीं लक्षणें दिसत आहेत. अशा वेळीं, सरकारनें मामुली उपाय-योजना न करतां जरा धीरानें कडक उपाय योजले पाहिजेत.

( ३ ) छोटे अगर ग्रामीण उद्योगधंदे म्हणून ज्यांचें वर्गीकरण करण्यांत आलें आहे, अशांची जोपासना ग्रामीण भागांत करण्यांत यावी. ही योजना योग्य तऱ्हेनें अंमलांत आणली गेली तर औद्योगिक उत्पादनांत वाढ होईल, आणि देशांतील जवळ जवळ ६५ टक्के लोकांची ऊर्जितावस्था जवळ येईल. योजना अंमलांत आणतांना प्रांतांतील अगर संस्थानांतील जिल्हे हे संपूर्ण घटक म्हणून योजनेंत सामील करावे.

( ४ ) देशाच्या व्यापारी भरभराटीच्या दृष्टीनें मोठे अगर अवजड उद्योगधंदे सर्वांत अधिक महत्त्वाचे असतात. ह्या वर्गांत येणारे सर्व उद्योगधंदे मोठ्या शहरांतून आणि गांवांतून चालणारे असें समजलें जावें.

( ५ ) चलनवृद्धीसंबंधीं प्रमुख उद्योगपतींनीं आणि सार्वजनिक संस्थांनीं सरकारकडे आपलें म्हणणें कळविलें आहे. त्याचप्रमाणें, कांहीं अर्थशास्त्रज्ञांनींही ह्या विषयावर मतें व्यक्त केलीं आहेत. त्याशिवाय, कांहीं जबर कर आणि सरकारचें राष्ट्रीयीकरणाचें धोरण ह्याबद्दलही वरील हितसंबंधीयांनीं ज्या सूचना केल्या आहेत त्यांकडे सरकारनें तातडतोब लक्ष पुरवावें.

( ६ ) उद्योगधंद्यासाठीं भांडवल उभारण्याचे प्रयत्न विशेष कसोशीनें करण्यांत यावेत. १ हजार कोटी रुपयांचें भांडवल, जरूर तर व्याजाचा चढीचा दर देऊनही, उभारण्यांत यावें. हें झालें देशांतर्गत भांडवल. ह्याशिवाय १ हजार कोटी रुपयांचें भांडवल अमेरिकेकडून घेण्यांत यावें. येत्या पांच वर्षांत दरवर्षी ४०० कोटी रुपये भांडवल नवीन उद्योगधंद्यांत गुंतविण्याला वाव आहे.

( ७ ) मालाच्या उत्पादनाची आंकडेवार माहिती गोळा करण्यासाठी लवकर व्यवस्था झाली पाहिजे. अन्नादि वस्तूंच्या निर्मितीचे आंकडे अत्यंत कसोशीनें आणि पद्धतशीरपणें जमविले गेले पाहिजेत. हे आकडे गोळा करण्यासाठी तीन प्रकारचे 'प्रादेशिक प्रमाण घटक' ठरवून त्याप्रमाणें निरनिराळ्या नियमानुसार काम करण्यांत यावें.

( ८ ) औद्योगिक धोरणाबाबत मध्यवर्ती सरकार हें प्रांतिक सरकारें आणि संस्थानी सरकारें ह्यांच्याशी निकट सहकार्य करील अशी अपेक्षा आहे. सध्या मध्यवर्ती सरकारला राज्यकारभार पद्धतीच्या विस्कळीतपणाशीं झगडावें लागत आहे. सरकारला जसजसा अनुभव येत जाईल, तसतसें तें प्रांतिक आणि संस्थानी सरकारांना आपआपल्या अंतर्गत व्यवहारांत अधिक स्वातंत्र्य देऊं लागेल.

जगांतील प्रगतिप्रिय लोकांच्या बरोबरीनें आपणास चालावयाचें असेल तर देशाचे आर्थिक आणि लष्करी हितसंबंध ह्यांचें रक्षण करणें जरूर आहे. त्यासाठी यंत्रांचा अधिकाधिक उपयोग करण्यास सरकारनें उत्तेजन दिलें पाहिजे. यांत्रिक अवजारें आणि शक्ति ह्यांचा तुटवडा भरून काढल्याखेरीज देशाची विपन्नावस्था जाणार नाहीं. पाश्चात्य उद्योगप्रधान राष्ट्रांची कार्यक्षमता आणि बल आपल्या अंगीं आणण्यासाठी कोणत्या गुणांची जोपासना हिंदी जनतेंत केली पाहिजे ह्याचा विचार झाला पाहिजे. राजकीय पुढारी, उद्योगपती, समाजशास्त्रज्ञ आणि शिक्षणशास्त्रज्ञ ह्या सर्वांनीं ह्या कामीं लक्ष घातलें पाहिजे.

---

### शेत जमिनीची विक्री— स्वतः जमीन कसणाऱ्या मालकांस सवलत

बॉंबे टेनन्सी अँड ॲग्रि. लँड्स ॲक्टाच्या ६४ व्या कलमाप्रमाणें "जमीन मालका"च्या मनांत जमीन विकावयाची असल्यास त्यानें प्रथम तिची किंमत ट्रायब्यूनलकडून ठरवून घेतली पाहिजे. नंतर ती कुळाला आणि कलमांत सांगितलेल्या इसमांना अनुक्रमानें देऊं केली पाहिजे. "जमीन–मालक" ह्या संज्ञेंत प्रस्तुत प्रकरणीं स्वतः जमीन कसणारा मालक येत नाहीं आणि त्यास ६४ व्या कलमांतील बंधनें लागू नाहींत; ज्या जमिनींस कुळें नाहींत, अशांच्या मालकांनीं ( म्हणजे स्वतः जमीन कसणारांनीं ) ६४ व्या कलमाप्रमाणें ट्रायब्यूनलकडे जाण्याचें कारण नाहीं; असा सरकारनें खुलासा केला आहे.

---

### 'चित्रमयजगत्'—घटना अंक.

'चित्रमयजगत्' चा जानेवारी १९४९ चा अंक खास घटना अंक म्हणून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यांतील 'हिंदी घटनेचें स्थूल स्वरूप' हा लेख घटना परिषदेचे एक सभासद, श्री. भा. म. गुप्ते, यांनीं स्वतःच लिहिलेला असल्याकारणानें त्यांतील माहितीस अधिकृतता प्राप्त झाली आहे. 'मतदारसंघ व मतदान'; ह्या लेखांत 'एका प्रतिनिधीचा मतदारसंघ' व 'अनेक प्रतिनिधींचा मतदारसंघ' ह्यांतील भेद व फायदे–तोटे उत्तम प्रकारें विशद करून दाखविले आहेत. राज्यघटनेचा मसुदा ठरवितांना उसनवारी आवश्यक व अभिलषणीयच ठरते. अशी उसनवारी करण्यांत कमीपणा अजीबात नसून तावत्कालपर्यंत झालेल्या मानवी विचारांतील प्रगतीचा फायदा करून घेण्याची रास्त प्रवृत्ति या उसनवारींत दिसून येते, असें श्री. वासुदेव मुकुंद लिमये यांनीं 'नवी राज्यघटना आणि उसनवारी' ह्या आपल्या लेखांत मार्मिकपणें दाखवून दिलें आहे. हिंदुस्थानची आगामी राज्यव्यवस्था 'व लोकशाही घटना' हे दोन लेखहि अनुक्रमें श्री. पु. रा. लेले व श्री. देवगिरीकर यांच्यासारख्या अभ्यासू लेखकांनीं लिहिलेले असल्यामुळें वाचनीय झाले आहेत. एकंदरींत, हा अंक मोठा उपयुक्त व बोधप्रद झाला आहे.

स. वा. वा.

भाडेकरी कायदा व जागा वेठीचा कायदा
ह्यांचे संबंधीं

## मुंबई हायकोर्टाचे कांहीं ताजे निवाडे.

### (१) जागा वेठीसंबंधीं अमर्याद अधिकार

आपल्या जागा मुंबई सरकारनें वेठीच्या कायद्याखाली (बॉम्बे लँड रिक्विझिशन अ‍ॅक्ट, १९४८) ताब्यांत घेतल्याबाबतचे बरेचसे अर्ज, नुकतेच न्यायमूर्ती तेंडोलकर ह्यांनीं निकालांत काढले. जागा वेठीचे अधिकार प्रथमतः डिफेन्स ऑफ इंडिया रूल्सखाली सरकारनें धारण केले. त्यानंतर ह्यासंबंधीचा १९४७ चा ५ वा वटहुकूम जारी करण्यांत आला व शेवटीं १९४८ मध्यें कायदा करण्यांत आला. परंतु, वटहुकुमांत फक्त सार्वजनिक कार्यासाठीं जरूर असेल तरच जागा वेठीनें घेण्याचा सरकारला अधिकार होता. नव्या कायद्यानें हव्या त्या कार्यासाठीं (एनी परपज) जागा घेण्याचे अधिकार सरकारला प्राप्त झाले आहेत. त्यामुळें हायकोर्टाचे कांहींएक चालण्यासारखें नाहीं असा निर्णय देऊन न्यायमूर्तींनीं अशी टीका केली आहे कीं, सरकारचे हे अधिकार लोकशाहीशीं विसंगत आहेत. वापरण्यांत तारतम्य दाखविलें जाईलच अशी खात्री नाहीं, अशीहि भीति व्यक्त करून न्यायमूर्तींनीं कांहीं जागांचा ताबा अपरात्रीं अंधारांत घेतल्याचें व जागा वेठीनें घेण्याबाबतची नोटीस व जागा प्रत्यक्ष ताब्यांत घेण्याची क्रिया ह्या दोन्ही गोष्टी एकाच वेळीं केल्याचे प्रकार दाखवून देऊन त्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांना दोष दिला आहे, आणि भाडेकऱ्यांच्या घरांतील पुरुष पुढारी मृत्यू पावतांच आई, भाऊ, वगैरे अन्य कुटुंबियांकडून जागा काढून घेण्याचा अन्याय झाल्याचींहि उदाहरणें दाखवून देऊन त्याकडे सरकारचें लक्ष वेधिलें आहे.

### (२) वेठीनें घेतलेल्या जागेवर भाडेकऱ्याचा हक्क

सरकारनें वेठीनें घेतलेली जागा वेठ उठल्यावर पुनः भाडेकऱ्याकडे पूर्वीच्याच भाडेकरारानें जावी, असा निर्णय बाई ताराबाई पारेख विरुद्ध पदमचंद ह्या दाव्यांत न्यायमूर्ती कोयाजी ह्यांनीं दिला आहे. पदमचंद ह्यांजकडे भाड्यानें असलेली जागा मालक व भाडेकरी ह्या दोघांवर नोटिसा बजावून सरकारनें ५-५-४५ रोजीं भाडेकऱ्याकडून ताब्यांत घेतली व पुढें २७-५-४५ रोजीं त्यासच परत केली. तेव्हां सरकारच्या जागा-वेठीच्या हुकुमामुळें भाडेकरार रद्द झाला, असें पारेखबाई म्हणूं लागल्या. परंतु, भाडेकऱ्यानें जागा सोडून मालकाच्या ताब्यांत कधींच दिली नव्हती, तेव्हां केवळ वेठीच्या हुकुमामुळें भाडेकरार रद्द होत नाहीं, असा कोर्टानें निकाल दिला.

### (३) सरकारी जागेवरील इमारत व भाडें कायदा

सरकारी जागेवर बांधलेल्या खाजगी इमारतींतील भाडेकऱ्यांना सुद्धा कायद्याचें संरक्षण मिळतें, असा निर्णय न्यायमूर्ती तेंडोलकर ह्यांनीं लाला लक्ष्मीपाद सिंघानिया विरुद्ध मेसर्स लार्सेन अ‍ॅन्ड टोब्रो लि. ह्या दाव्यांत नुकताच दिला आहे. बॅलार्ड एस्टेट वरील जे. के. बिल्डिंग खालील जागा बॉंबे पोर्ट ट्रस्टकडून भाड्यानें घेतलेली असून भाडेकराराची नव्याण्णव वर्षांची मुदत संपल्यावर इमारत बॉंबे पोर्ट ट्रस्टच्या मालकीची व्हावयाची आहे. अशा प्रकारें सदरील इमारत ही सरकारी मालकीची असल्यामुळें तिला भाडेकरी कायदा लागू नाहीं व म्हणून प्रतिवादीकडून जागेचा ताबा मिळावा असा दावा वादी सिंघानिया ह्यांनीं आणला. परंतु भाडेकराराची मुदत संपली नाहीं, तोंपर्यंत इमारत जरी सरकारी जागेवर बांधली असली तरी तिजवरील मालकी वादीकडेच आहे, ती मालकी सरकारकडे तूर्त नाहीं, असा निर्णय न्यायमूर्तींनीं दिला. सबब, सदर इमारतींतील भाडेकऱ्यांनाहि भाडेकरी कायद्याचें संरक्षण आहे, असें ठरवून वादीचा दावा काढून टाकला.

### (४) भाड्याच्या जागेवर वारसा हक्क

भाडेकरी मयत झाल्याबरोबर त्याच्या जागेवरील त्याचा हक्क नष्ट होतो काय, असा प्रश्न श्रीमती परुळेकर ह्यांनीं केलेल्या अर्जाचे कामीं हायकोर्टापुढें नुकताच उपस्थित झाला होता. बाईचे यजमान डॉ. परुळेकर हे मरण पावतांच त्यांची ठाकुरद्वार वरील दवाखान्याची जागा सरकारनें वेठीच्या कायद्याखाली ताब्यांत घेण्याचा हुकूम केला. तेव्हां बाईंनीं हायकोर्टाकडे दाद मागितली. आपला मुलगा वैद्यकीय शिक्षण घेत असून त्याला ह्या जागेची जरूर आहे असें बाईंचें म्हणणें होतें. जागा ज्याचे नांवावर भाड्यानें असेल तो मनुष्य मरतांच त्याच्या कुटुंबियांकडून ती जागा काढून घ्यावी हा अन्याय होय; कुटुंबाचा पुढारी वारला तर त्याच्या मागें भाड्याच्या जागेवरील त्याचा हक्क त्याच्या वारसांकडे जातो, असें स्पष्ट मत नमूद करून न्यायमूर्ति तेंडोलकर ह्यांनीं सरकारी हुकूम रद्द ठरवला.

---

### सचोटी असल्यावर पैशाचा तुटवडा पडणार नाहीं

युनायटेड वेस्टर्न बँकेच्या नाशिक शाखेनें आपली मेन रोडवरील कचेरी म. गांधी रोडवर रमेश सदनांत ता. १ फेब्रुवारी रोजीं नेली. त्यानिमित्त ता. २५ फेब्रुवारी रोजीं श्री. भाऊसाहेब हिरे, बी. ए., एलएल. बी. ह्यांच्या अध्यक्षतेखाली पानसुपारी-समारंभ झाला. त्याप्रसंगीं बँकेचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब चिरमुले, ह्यांनीं आपल्या आशीर्वादांत कर्जदारांच्या सचोटीचें महत्त्व वर्णन केलें. तें सध्याच्या परिस्थितींत विशेष उद्बोधक वाटेल. गिऱ्हाइकांच्या सचोटीवर बँकिंगचा धंदा अधिष्ठित असूं शकला, तर त्याची सामाजिक उपयुक्तता पुष्कळच वाढते, असा अनुभव आहे. विमामहर्षि म्हणाले:—

"कर्जाऊ देण्यांत येणाऱ्या रकमांची परत फेड ठरलेल्या मुदतींत विनासायास करून घेणें ज्या बँकेस चांगल्या रीतीनें साधतें, तिलाच आपल्याबद्दल जनतेंत विश्वास निर्माण करता येतो व या विश्वासामुळें विखुरलेलें धन तिला आपल्याकडे खेंचून घेतां येतें. कर्जदाराची व्यावहारिक सचोटी, त्याचें भांडवल व उद्योग करण्याची कार्यक्षमता, यावरच त्याची पत ओळखली जाते. त्याची सचोटी हेंच काय तें बँकांच्या कर्जास मूळ तारण होय. तिचा अभाव असल्यास त्याच्या भांडवलाचा अगर उद्योगक्षमतेचा उपयोग काय? तेव्हां माझें नम्र सांगणें इतकेंच कीं, सचोटी कोणत्याही प्रसंगीं कायम ठेवा. मग पैशाची ददात भासणार नाहीं."

---

### शेंबेकर-तांबे-वीरकर विलायतेस जाणार

रावबहादुर शेंबकर, बी. तांबे कं. लि. चे श्री. काकासाहेब तांबे व वेलणकर उपाहारगृहाचे श्री. वीरकर हे तिघे ता. २५ मार्च रोजीं मुंबईहून विलायतच्या प्रवासास निघणार आहेत. युरोपप्रमाणें अमेरिकेसहि जाऊन तेथील व्यापारी व औद्योगिक परिस्थितीचें ते निरीक्षण करणार आहेत.

---

### सहकारी कायद्यांत दुरुस्ती

मुंबई सहकारी कायद्याच्या अंमलबजावणींत येणाऱ्या कांहीं अडचणी दूर करण्यासाठीं कायद्यांत दुरुस्ती करण्यांत यावयाची आहे. ही दुरुस्ती करणाऱ्या बिलाचा मसुदा २१ फेब्रुवारी, १९४९ च्या गॅझेटांत प्रसिद्ध झाला आहे.

# मुंबई प्रांतांतील दुकानें व व्यवसाय-केंद्रें ह्यांचा कायदा, १९४८

## ( बॉम्बे शॉप्स ॲन्ड एस्टॅब्लिशमेंटस् ॲक्ट, १९४८ )

व्यावसायिकांसाठीं संपूर्ण सुबोध माहिती

( लेखकः– स. वा. दातार, बी. एस्सी., एलएल्. बी. )

**कांहीं नवे विशेष.**

- नोंदणी दाखला आवश्यक व सक्तीचा ठरला.
- नोंदणी दाखल्यांतील माहितींत फेरफार झाल्यास दाखला दुरुस्त करून घ्यावा लागणार.
- नोंदणी दाखल्यासाठीं व फेरफार नोंदविण्यासाठी फी द्यावी लागणार.
- स्वच्छता, हवाउजेड व रंगसफाई ह्यांचे नियम बंधनकारक झाले.
- उपाहारगृहांतील नोकरांना परिचय-पत्रें (आयडेन्टिटी कार्ड्स्) द्यावीं लागणार.
- वर्षांतून चौदा दिवस भरपगारी रजा द्यावी लागणार.
- जादा कामाचा पगार, उपाहारगृहांतील नोकरांना नेहमीच्या दुप्पट दरानें व अन्य नोकरांना दीडपट दरानें द्यावा लागणार.
- तीन महिन्यांपेक्षां अधिक काळ कामावर असलेल्या नोकरास काढून टाकण्यापूर्वी चौदा दिवसांची नोटीस द्यावी लागणार.
- पगार थकल्यास पेमेंट ऑफ वेजेस् ॲक्ट खालीं सवलतीच्या सर्वांत कोर्टाकडून नोकराची दाद घेतली जाणार.

## प्रकरण १ लें

### प्रास्ताविक

सध्यां चालू असलेला 'बॉम्बे शॉप्स् ॲन्ड एस्टॅब्लिशमेंट्स् ॲक्ट १९३९' ( गुमास्ता कायदा ) ह्याचे ऐवजी आतां मुंबई सरकारनें हा नवा विस्तृत व व्यापक कायदा केला असून त्यास ३ जानेवारी १९४९ रोजीं गव्हर्नर जनरल ह्यांची संमति मिळाली आहे. मूळ कायदा बॉम्बे गव्हर्मेंट गॅझेटच्या ११ जानेवारी १९४९ च्या अंकांत भाग ४ मध्यें पृष्ठें १ ते २४ ह्यांचेवर प्रसिद्ध झाला असून ह्या कायद्याखालीं केलेले नियम बॉम्बे गव्हर्मेंट गॅझेट-एक्स्ट्रॉऑर्डिनरीच्या ८ फेब्रुवारी १९४९ च्या अंकांत भाग ४–ब मध्यें पृष्ठें २३४ ए ते पी ह्यांजवर प्रसिद्ध झाले आहेत.

ह्यापुढील विवेचनांत संदर्भासाठी प्रत्येक मुद्याच्या परिच्छेदाचे शेवटीं चौकटी कंसांत मूळ कायद्यांतील कलमांचे ( सेक्शन्सचे ) व त्याखालीं केलेल्या नियमांचे (रूल्सचे) आंकडे देण्यांत आले आहेत.

**व्याप्ति व अंमलबजावणी**—ह्या कायद्याची व्याप्ति सर्व मुंबई प्रांतभर असून मुंबई सरकार गॅझेटमध्यें जाहीर करून पंचवीस हजार किंवा त्याहून अधिक लोकवस्तीच्या सर्व अथवा विशिष्ट शहरांना हा कायदा लागू करील. त्याचप्रमाणें पंचवीस हजारांपेक्षां कमी वस्तीच्याहि शहरांना जरूर तर सरकार हा कायदा लागू करूं शकेल. [ कलम १ ] शहरें—प्रथमतः खालील शहरांना वा शहरविभागांना हा कायदा लागू होईल ( १ ) मुंबई शहर ( २ ) अहमदाबाद शहर व लष्कर ( ३ ) पुणें शहर व पुणें सबर्बन म्युनिसिपल विभाग ( ४ ) पुणें लष्कर ( ५ ) सोलापूर ( ६ ) बार्शी ( ७ ) नासिक ( ८ ) गोध्रा ( ९ ) सुरत ( १० ) कल्याण ( ११ ) वांद्रा ( १२ ) पार्ले-अंधेरी ( १३ ) घाटकूपर-किरोळ ( १४ ) पनवेल ( १५ ) कुर्ला ( १६ ) बलसार ( १७ ) मालेगांव ( १८ ) धुळें ( १९ ) ठाणा ( २० ) नडियाद ( २१ ) बारामती ( २२ ) दोहद ( २३ ) अंमळनेर ( २४ ) येवला ( २५ ) कापडगंज ( २६ ) पंढरपूर ( २७ ) भुसावळ ( २८ ) जळगांव ( २९ ) सातारा ( ३० ) रत्नागिरी ( ३१ ) अहमदनगर ( ३२ ) चाळिसगांव ( ३३ ) बेळगांव ( ३४ ) विजापूर ( ३५ ) धारवाड ( ३६ ) महाड ( ३७ ) अंकलेश्वर ( ३८ ) उरण ( ३९ ) भडोच ( ४० ) गदग ( ४१ ) हुबळी ( ४२ ) भिवंडी [ शिड्यूल I ]

**व्यवसाय**—सर्व प्रकारचीं दुकानें, व्यवसाय-केंद्रें, उपाहारगृहें, वस्तीचीं उपाहारगृहें, खानावळी, खाद्यालयें, हॉटेल्स, रेस्टोरॉं, गेस्ट हाऊसस, थिएटर्स, सिनेमागृहें, नाट्यगृहें व इतर अन्य सार्वजनिक करमणुकगृहें ह्या सर्वांना हा कायदा लागू होणार आहे. 'सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट' खालीं नोंदलेल्या संस्था आणि धर्मादाय व विश्वस्त नोंदलेल्या अथवा न नोंदलेल्या संस्था ह्याहि ह्या कायद्याच्या कक्षेंत येणार आहेत. [ कलम १ ( ४ ) ( ८ ) ] परंतु मध्यवर्ती व प्रांतिक सरकारच्या कचेऱ्या, म्युनिसिपल कचेऱ्या, लोकल बोर्ड कचेऱ्या, आणि बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या व रेल्वे कंपन्यांच्या कचेऱ्या ह्यांना आणि बाजार व यात्रा ह्यांचे ठिकाणीं धर्मकार्यार्थ उघडलेलीं विक्री-केंद्रें ह्यांना ह्या कायद्यांतून वगळण्यांत आलें आहे. [ कलम ४ शिड्यूल II ( I ) ]

ज्या संस्था ह्या कायद्याचे कक्षेंत येत नाहींत त्यांना सुद्धां सरकार जरूर तेव्हां गॅझेटमध्यें जाहिर करून हा कायदा अथवा त्यांतील इष्ट ते भाग लागू करूं शकेल. [ कलम ५ ] त्याचप्रमाणें विशिष्ट कालावधींत योग्य त्या अटी घालून सरकार ह्या कायद्याचा अथवा त्यांतील कांहीं भागांचा अंमल तात्पुरता स्थगितहि करूं शकेल. [ कलम ६ ] अशाप्रकारें ह्या कायदा तात्पुरता स्थगित करण्याचे प्रसंग म्हणजे ( १ ) ख्रिस्तमस ( २ ) दिवाळी ( ३ ) पटेटी ( ४ ) जमशेडी नवरोज ( ५ ) रमजान व रमजान ईद आणि ( ६ ) गणेशचतुर्थी हे असून त्याशिवाय सरकार जे सार्वजनिक संकटाचे प्रसंग ( पब्लिक इमर्जन्सी ) अथवा सार्वजनिक यात्रेचे, प्रदर्शनाचे अथवा सणासुदीचे जे दिवस जाहीर करील त्यावेळींहि ह्या कायद्याचा अंमल कमी जास्त ढिला करण्यांत येईल. [ नियम ४ ]

ह्या कायद्याचे अधिकाराबाबत ज्या स्थानिक संस्थांचे उल्लेख आहेत त्या म्हणजे सिटी ऑफ बॉम्बे म्युनिसिपल ॲक्ट १८८८; बॉम्बे डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्ट १९०१; बॉम्बे म्युनिसिपल बरोज ॲक्ट १९२५ ह्यांचेखालीं स्थापन केलेल्या म्युनिसिपालिट्या अथवा बॉम्बे लोकल बोर्डस ॲक्ट १९२३ ह्याचेखालीं स्थापन केलेली लोकलबोर्डें ह्या संस्था होत. [ क. २ ( १५ ) ]

दिवस हा सामान्यतः मध्यरात्रीपासून पुढील चोवीस तासांचा समजण्यांत यावयाचा आहे. परंतु ज्या नोकरांना मध्यरात्रीनंतरहि काम करावें लागतें त्यांच्या बाबतींत दिवस हा काम सुरू होण्याच्या वेळेपासून पुढील चोवीस तासांचा समजावयाचा आहे. [ क. २ ( ५ ) ]

व्यवस्थापक (मॅनेजर) ह्या जागेवर ज्या कोणाहि माणसास नेमलें असल्याचें मालकानें नमूद केलेलें असेल त्याला व्यवस्थापक समजण्यांत येईल. [क. २ (१६)].

वरील शिवाय ज्या शब्दांना विशेष व्यापक अर्थ आहेत त्यांचा उल्लेख संदर्भ आलेला आहे त्या ठिकाणीं केलेला आहे.

ह्या कायद्याला दोन परिशिष्टें (शिड्यूल्स) जोडलेलीं असून नियमावलीस (रूल्सना) हि दोन परिशिष्टें जोडलेलीं आहेत. ह्यासाठी त्यांचे उल्लेख स्वतंत्रपणें केले आहेत.

फॉर्म्स म्हणजे ह्या कायद्याखालील नियमानुसार ठरविण्यांत आलेले फॉर्म्स. ह्या प्रकारचे छापील फॉर्म्स योग्य वेळीं बाजारांत आयते विकत मिळूं शकतील.

## प्रकरण २ रें

### व्यवसाय–केंद्रांची नोंदणी

**नोंदणी**—हा कायदा ज्या शहरांना लागू होईल त्यांतील सर्व दुकानांना व व्यवसाय-केंद्रांना म्युनिसिपालिटीकडे अर्ज पाठवून नोंदणी दाखले घ्यावे लागतील. त्याचप्रमाणें नवीन दुकान वा व्यवसाय काढल्यास त्यासाठींहि नोंदणीदाखला घ्यावा लागेल. नोंदणी दाखल्यासाठी पाठवावयाच्या अर्जास मुदत हा कायदा अंमलांत आल्या तारखेपासून अथवा नवीन व्यवसाय सुरू केल्यापासून **तीस दिवसांची** दिलेली आहे. [क. ४]

**फॉर्म 'ए'**—नोंदणीसाठी करावयाचे अर्ज फॉर्म 'ए' प्रमाणें करावयाचे असून त्यांत पुढीलप्रमाणें सदरें आहेतः—

१ व्यवसायाला नांव असल्यास तें नांव. २ पोस्टाचा पत्ता. ३ मालका (एम्प्लॉयर) चें नांव. ४ व्यवस्थापक (मॅनेजर) असल्यास त्याचें नांव. ५ प्रकार म्हणजे दुकान, व्यवसाय-केंद्र, वस्तीचें अथवा साधें उपाहार गृह, थिएटर किंवा अन्य सार्वजनिक करमणुकीचें ठिकाण ह्यापैकीं कोणत्या प्रकारचा व्यवसाय आहे त्याचा उल्लेख. ६ व्यवसायाचें स्वरूप ७ मालकाच्या कुटुंबांतील व्यवसायांत काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या—पैकीं स्त्रिया व तरुण यांची संख्या स्वतंत्र दाखवावी. ८ व्यवस्थापकीय वा विश्वासाच्या कार्यासाठी योजलेल्या अन्य इसमांची संख्या. ९ एकूण नोकरांची संख्या—पैकीं स्त्रिया व तरुण यांची संख्या स्वतंत्र दाखवावी. [क. ७ नि. ५]

**नोंदणीसाठी फी**—फॉर्म 'ए' दाखल करतांना त्यासाठी खालीलप्रमाणें फी द्यावी लागेल. (१) व्यवसायकेंद्रें–१० किंवा अधिक नोकर: ५ रुपये (२) व्यवसाय-केंद्रें– १० पेक्षां कमी नोकर: २ रु. ८ आ. (३) दुकानें–१० किंवा अधिक नोकर: ५ रुपये (४) दुकानें–१० पेक्षां कमी नोकर: २ रु. ८ आ. (५) केवळ दूध, भाजीपाला, फळफळावळ, मासे, मांस, पाव, पानपट्टी, विड्या, सिगरेट्स् व काड्याच्या पेट्या ह्यांचीं दुकानें: १ रुपया (६) वस्तीचीं उपाहारगृहें: ५ रुपये (७) उपाहारगृहें–१० किंवा अधिक नोकर: ५ रुपये (८) उपाहारगृहें–१० पेक्षां कमी नोकर: २ रु. ८ आ. (९) थिएटर्स व करमणुकगृहें: ५ रुपये. (१०) एकहि नोकर कामाला लावलेला नसलेलीं व्यवसाय-केंद्रें: १ रुपया. [नि. ५: नियम–शिड्यूल I].

अर्ज व फी रीतसरप्रमाणें आली कीं म्युनिसिपॅलिटीनें नेमलेले इन्स्पेक्टर त्या अर्जांतील माहिती बरोबर असल्याची खात्री करून घेऊन नोंदणी दाखले देतील. ते दाखले दुकानांत अथवा व्यवसाय केंद्रांत **ठळक ठिकाणीं लावून ठेवावे लागतील.** [क. ७(२)].

व्यवसाय कोणत्या प्रकारचा आहे ह्याबाबत इन्स्पेक्टर व मालक ह्यांच्यांत मतभेद झाल्यास त्याबद्दल मुंबई शहरांत म्युनिसिपल कमिशनर आणि अन्य ठिकाणीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट ह्यांचें मत इन्स्पेक्टरांनीं मागवावयाचें असून त्यांचा निर्णय अखेरचा समजला जाईल. [क. ७ (३), नि. ३].

**फेरफाराची नोंद**—फॉर्म 'ए' प्रमाणें भरून दिलेल्या माहितींत कोणत्याहि प्रकारचा फरक घडून आल्यास मालकांनीं **तो सात दिवसांचे आंत**, म्युनिसिपल इन्स्पेक्टर ह्यांना कळवावयाचा आहे. त्यासाठीं **फॉर्म 'डी'** ची योजना असून त्याचेबरोबर **फी** पाठवावयाची ती १० किंवा अधिक नोकर असलेल्या (१) व्यवसाय–केंद्रांना, (३) दुकानांना (७) उपाहारगृहांना आणि (६) वस्तीच्या उपाहारगृहांना व (९) थिएटर्सना आणि अन्य करमणूकगृहांना–८ आणे; १० पेक्षां कमी नोकर असलेल्या (२) व्यवसाय–केंद्रांना (४) दुकानांना व (८) उपाहारगृहांना–४ आणे; (५) केवळ दूध, भाजीपाला, फळफळावळ, मासे, मांस, पाव, पानपट्टी, बिड्या, सिगरेट्स् व काड्याच्या पेट्या ह्यांच्या दुकानांना–२ आणे आणि (१०) एकहि नोकर नसलेल्या व्यवसाय–केंद्रांनाहि–२ आणे अशी आहे. [क. ८ नि. ७ नियम–शिड्यूल II] सदरप्रमाणें फेरफारांची माहिती व फी आल्यावर इन्स्पेक्टर ती माहिती बरोबर असल्याचें पाहून त्याप्रमाणें आपल्याजवळच्या म्युनिसिपल नोंद पुस्तकांत फेरफार करून त्याप्रमाणें नोंदणीदाखला दुरुस्त करून देतील अथवा जरूर तर नवा दाखला देतील.

**व्यवसाय–समाप्तीची माहिती**—व्यवसाय बंद केल्यास मालकानें त्याबद्दल दहा दिवसांचे आंत इन्स्पेक्टर ह्यांस लेखी कळविलें पाहिजे. [क. ९]

## प्रकरण ३ रें

### दुकानें व व्यवसाय–केंद्रें

दुकान म्हणजे सर्व प्रकारचा माल, वस्तु, व साहित्य ज्या ठिकाणीं घाऊक वा किरकोळ विकलें जातें किंवा गिऱ्हाइकांचें कांहीं काम केलें जातें अशी जागा. ह्यांत एकाद्या व्यापाराशी अथवा धंद्याशीं संबंध असलेली त्याच जागेंतील अथवा अन्य जागेंतील कचेरी, कोठी, गुदाम, माल, प्रदर्शनासाठी मांडण्याची जागा अथवा काम करण्याची जागा ह्यांचाहि समावेश होतो. [क्र. २ (२७)]

व्यवसाय–केंद्र (कमर्शियल एस्टॅब्लिशमेंट) म्हणजे कोणताहि व्यापार, धंदाउद्योग वा व्यवसाय चालविण्यासाठी उघडलेली कचेरी अथवा जागा. व्यवसायाशीं संबद्ध अथवा आनुषंगिक असें कोणतेंहि काम ज्या ठिकाणीं चालतें त्या ठिकाणाचाहि समावेश ह्यांत होतो. 'सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट' खालीं नोंदलेल्या संस्था आणि नोंदलेल्या अथवा न नोंदलेल्या धर्मादाय नि विश्वस्त संस्था ह्यांचाहि समावेश व्यवसाय–केंद्र ह्या शब्दांत होतो. [क. २ (४)]

**दुकानांच्या वेळा**—केवळ दूध, भाजीपाला, फळफळावळ, मासे, मांस, पाव आणि सरकार जाहीर करील ते इतर पदार्थ ह्यांची विक्री करणारीं दुकानें **पहाटे पांच** वाजण्यापूर्वी उघडूं नयेत. ह्या व्यतिरिक्त इतर पदार्थांचीं दुकानें **सकाळीं सात** वाजण्यापूर्वी उघडूं नयेत. [क. १०]

पानपट्टी, बिड्या, सिगरेट्स्, काड्याच्या पेट्या व तत्संबद्ध अन्य वस्तू ह्यांचीं दुकानें रात्रीं **अकराचे** आंत बंद करावीं आणि ह्या वस्तूंखेरीज अन्य वस्तूंचीं दुकानें रात्रीं **साडेआठचे** आंत बंद करावीं.

मात्र दुकान बंद करण्याच्या ऐन सुमारास जर एकादें गिऱ्हाईक आलें अथवा आलेलें असून त्यास माल दिला गेलेला नसला तर

पुढील पंधरा मिनिटांत त्यास माल देण्याचें काम आवरावें. [ क. ११ ]

वरील अटींना धरून निरनिराळया दुकानांसाठीं, निरनिराळया प्रदेशांत, निरनिराळया ऋतूंत दुकानें उघडण्याच्या वेळा अधिक उशीरा व दुकानें बंद करण्याच्या वेळा अधिक लवकर सरकार ठरवून देऊं शकेल. [ क. १० ( २ ); ११ ( २ ). ]

**फेरीवाल्यांवर बंधन**—फेरीवाले जे पदार्थ विकीत असतील त्या प्रकारच्या पदार्थांचीं दुकानें उघडण्याच्या वेळेआधीं व बंद करण्याच्या वेळेनंतर कोणाहि फेरीवाल्यास माल विक्री करतां येणार नाहीं; जर त्यानें केली तर त्याचा माल जप्त करण्यांत येऊन त्याजवर खटला भरण्यांत येईल. [ क. १२ ]

**व्यवसाय-केंद्रांच्या वेळा**—कोणतेंहि व्यवसाय केंद्र सकाळीं साडेआठचे आधीं उघडूं नये व सायंकाळीं साडेआठचे नंतर बंद करण्यास चुकूं नये. सरकारला विशिष्ट व्यवसाय, केंद्रें, विशिष्ट ऋतूंत, वरील वेळांच्या आधीं बंद करावीं वा उशीरा उघडण्यांत यावीं असें ठरवितां येईल. [ क. १३ ]

**कामाचे तास**—कोणत्याहि दुकानांत अथवा व्यवसाय केंद्रांत कोणाहि नोकरास दर दिवसाला **नऊ तास** आणि दर आठवड्याला **अठ्ठेचाळीस तास** ह्यापेक्षां अधिक वेळ कामावर ठेवूं नये अथवा काम करूं देऊं नये.

कोणाहि दुकान अथवा व्यवसाय-केंद्रांतील नोकरास जादा काम सांगितल्यास अथवा करूं दिल्यास अशा जादा कामामुळें वाढलेले कामाचे तास एका आठवड्यांत तीनापेक्षां अधिक वाढता कामा नयेत.

हिशेब पुरे करण्यासाठीं व माल-मोजणी करण्यासाठीं, अथवा अशाचप्रकारें ठरविलेल्या विशिष्ट प्रसंगांसाठी सरकार वर्षांतून सहा दिवस नेमून देईल. त्या दिवशीं कोणाहि नोकरास जादा काम सांगता येईल अथवा करूं देता येईल. परंतु त्या जादा कामाचे सहाहि दिवसांचे एकूण तास **चोवीस** पेक्षां अधिक होता कामा नयेत. [ क. १४ ]

हे जादा कामाचे सरकारनें ठरविलेले **दिवस** ३१ मार्च, ३० जून, दिवाळी पाडव्याचे आधींचे तीन दिवस व ३१ डिसेंबर, असे आहेत. [ नि. ८ ]

**विश्रांति काल व कामाच्या तासांची विभागणी:**—दुकानांतील कोणाहि नोकराकडून मध्यंतरीं निदान एका तासाची तरी विश्रांति दिल्याशिवाय सतत पांच पेक्षां अधिक तास काम घेऊं नये. ह्यासाठीं नोकराच्या कामाच्या तासांची जी विभागणी (स्प्रेड-ओव्हर) करावयाची तिचा अवधी दिवसास सामान्यत: अकरा तासांहून अधिक होऊं नये. नोकराकडून जादा काम घेतल्यामुळें ज्या दिवशीं कामाचे तास वाढतील त्या दिवशीं ह्या विभागणीचा अवधी चौदा तासांपेक्षां अधिक होऊं नये आणि हिशेबासाठीं अथवा माल-मोजणीसाठीं जे जादा कामाचे दिवस ठरविलेले असतील त्या कोणत्याहि दिवशीं ह्या विभागणीचा अवधी सोळा तासांपेक्षां अधिक होऊं नये. [ क. १५, १६ ] मात्र कोणत्याहि कामाच्या दिवशीं जें दुकान सतत तीन तास पूर्णपणें बंद ठेवण्यांत आलें असेल त्या दुकानांतील कामाच्या तासांच्या विभागणीचा अवधी बारा तासांपेक्षां अधिक होऊं नये. [ क. १६ ]

व्यवसाय-केंद्रांतील नोकरांनाहि मध्यंतरीं एका तरी तासाची विश्रांति दिल्याशिवाय सतत पांच तास काम करावयास लावता येणार नाहीं. ह्यासाठी करावयाच्या कामाच्या तासांच्या विभागणीचा अवधी अकरा तासांपेक्षां अधिक असूं नये. परंतु सरकार हा अवधी सर्वच व्यवसाय-केंद्रांच्या बाबतींत अथवा विशिष्ट किंवा विशिष्ट प्रकारच्या व्यवसाय-केंद्रांच्या बाबतींत वाढवूं शकेल. [ क. १५, १७ ]

**साप्ताहिक भरपगारी सुट्टी**—प्रत्येक दुकानच्या व व्यवसाय-केंद्राच्या सर्व नोकरांना आठवड्यांतून एक दिवस भरपगारी सुट्टी यावी लागेल. नोकर जर रोजंदारीवर असेल तर त्याला सुट्टीच्याहि दिवसाचा रोज द्यावा लागेल. अशी सुट्टी देण्यासाठी सर्व दुकानें व व्यवसायकेंद्रें आठवड्यांतून एक दिवस बंद ठेवण्यांत येतील. वर्षाच्या आरंभींच प्रत्येक मालकानें आपला सुट्टीचा वार ठरवून त्याबद्दल इन्स्पेक्टरला कळवावें आणि आपल्या व्यवसायाच्या जागेंत ठळक ठिकाणीं सुट्टीची नोटीस लावून ठेवावी. तीन महिन्यांतून एकदां ह्यापेक्षां अधिक वेळां मालकानें हा सुट्टीचा वार बदलूं नये आणि जेव्हां बदल केला जाईल तेव्हां इन्स्पेक्टर ह्यांना तो कळविण्याची व नोटीस लावून तो जाहीर करण्याची खबरदारी घ्यावी. सुट्टीच्या दिवशीं नोकरास कोणत्याहि प्रकारें कामावर बोलावूं नये. [ क. १८ ]

**जादा कामाबद्दल नोटीस**—हिशेबाच्या व मालमोजणीच्या कामासाठी जे दिवस सरकारनें जाहीर केले असतील त्या दिवशीं नोकरांना जादा कामावर लावण्याची मालकाची इच्छा असल्यास तशी नोटीस कामाच्या दिवसापूर्वी चोवीस तास इन्स्पेक्टर ह्यांना दिली पाहिजे. जर कांहीं अपरिहार्य कारणांमुळें अशी नोटीस मालकास चोवीस तास आधीं देतां आली नाहीं तर त्यानें ती जादा कामाच्या दिवशीं दिली पाहिजे. [ नि. ९ ]

## प्रकरण ४ थें

### वस्तीचीं व साधीं उपाहारगृहें

उपाहारगृह ह्या शब्दांत हॉटेल, रेस्टोरां, ईटिंग हाऊस, क्लब, खानावळ, विश्रांतिगृह अथवा खाद्यपदार्थांचें दुकान ह्या सर्वांचा समावेश होत असून वस्तीचें उपाहारगृह ( रेसिडेन्शियल हॉटेल ) म्हणजे ज्यांत प्रवासी वगैरे लोकांसाठीं राहण्याजेवण्याच्या सोयी केलेल्या असतात अशा खानावळी, क्लब्स अथवा गेस्ट हाऊसेस ह्यांचेसारखीं उपाहारगृहें होत. [ क. २ ( २४ ) ( २५ ) ]

**वेळा**—कोणतेंहि उपाहारगृह कोणत्याहि दिवशीं पहांटे पांच पूर्वीं उघडूं नये आणि रात्रीं अकरानंतर चालू ठेवूं नये. उपाहारगृहांतील कोणाहि नोकराच्या कामाला सुरवात पहांटे साडे चार पूर्वी होऊं नये व कोणाहि नोकराचें काम पुरें होण्यास रात्रीं साडे-अकरापेक्षां अधिक उशीर होऊं नये. मात्र उपाहारगृह बंद होण्याच्या ऐन सुमारास जें गिऱ्हाईक येईल त्यास अथवा तत्पूर्वी आलेल्या गिऱ्हाइकास खाद्यपदार्थ देण्याचें काम झालेलें नसेल तर तें काम बंद होण्याच्या वेळेनंतरच्या पंधरा मिनिटांत पुरें करावें.

सरकारला विशिष्ट प्रसंगीं विशिष्ट विभागांतील विशिष्ट उपाहारगृहें वर ठरविलेल्या वेळेनंतर उघडावींत अथवा ठरविलेल्या वेळेपूर्वी बंद करावींत, असें ठरवितां येईल.

वर्षांतून फक्त दहा दिवस सणाच्या अगर अन्य तत्सम प्रसंगीं सरकार गॅझेटमध्यें प्रसिद्ध करून निरनिराळया प्रदेशांतील निरनिराळया उपाहारगृहांना खास सवलतीच्या अशा उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळा ठरवून देऊं शकेल. [ क. १९ ]

दुकानें उघडीं ठेवण्याचा जो काळ ह्या कायद्यानें ठरवून दिलेला आहे तो काळ खेरीज करून अन्य वेळीं उपाहारगृहांनाहि बाहेरच्या गिऱ्हाइकांना माल विकत देतां येणार नाहीं. उपाहारगृहांत बसून खावयासाठी मात्र त्यांना कोणतेहि खाद्य पदार्थ अशा काळांत विकतां येतील. [ क. २० ]

**कामाचे तास**—कोणत्याहि उपाहारगृहांतील कोणाहि नोकरास सामान्यपणें दर दिवसाला नऊपेक्षां अधिक तास काम देतां येणार नाहीं.

सणासुदीचे जे दिवस सरकार जाहीर करील त्या कोणत्याहि दिवशीं नोकराला जादा तीन तासपर्यंत अधिक काम करतां येईल. [क. २१]

**विश्रांति व कामाच्या तासांची विभागणी**—निदान एका तासाची तरी विश्रांति दिल्याशिवाय उपाहारगृहांतील कोणाहि नोकरास सतत पांचपेक्षां अधिक तास काम करावयास लावूं नये, आणि ह्यासाठीं कामाच्या तासांची जी विभागणी करावयाची तिचा अवधी चौदा तासांपेक्षा अधिक असूं नये. मात्र सणासुदीचे जे दिवस जादा कामासाठीं म्हणून सरकार जाहीर करील, त्या दिवसांची कामाच्या तासांची विभागणी कोणत्या अवधीपर्यंत करावयाची ह्यासंबंधीं माहिती व अटी सरकार असे दिवस जाहीर करील तेव्हां त्याबरोबरच प्रसिद्ध करील. [क. २२, २३]

**साप्ताहिक भरपगारी सुट्टी**—उपाहारगृहांतील प्रत्येक नोकरास आठवड्यांतून निदान एक दिवस सुट्टी द्यावी. नोकर जर रोजंदारीवर असेल तर सुट्टीच्या दिवसाचाही रोज त्याला द्यावा. सुट्टीच्या दिवशीं उपाहारगृहांतील कोणतेंहि काम त्याला करावयास लावूं नये. मात्र ज्या नोकरांच्या कामाचें स्वरूपच असें असेल कीं आठवड्यांतून त्यांना सहापेक्षां कमी दिवस काम पडत असेल तर मग त्या नोकरांना मात्र साप्ताहिक सुट्टी देण्याची आवश्यकता नाहीं. [क. २४]

**परिचय-पत्रिका** (आयडेंटिटी कार्ड)—सर्व प्रकारच्या उपाहारगृहांतील प्रत्येक नोकरास मालकानें एक परिचयपत्रिका द्यावयाची आहे. इन्स्पेक्टर ह्यांनीं मागितल्यास नोकराला ती केव्हांही काढून दाखविता आली पाहिजे. ह्या परिचयपत्रिकेंत खालीलप्रमाणें माहिती द्यावी लागेल:-(अ) मालकाचें नांव (ब) उपाहारगृहाचें नांव व पत्ता (क) नोकराचें नांव व पत्ता (ड) कामाचे तास, विश्रांतीच्या वेळा आणि साप्ताहिक सुट्टीचा दिवस [क.२५]

## प्रकरण ५ वें

### नाट्यगृहें (थिएटर्स) व करमणूक गृहें

थिएटर्स, नाट्यगृहें व करमणूकगृहें ह्या शब्दांत थिएटर्स, सिनेमा व बोलपटगृहें आणि अन्य करमणूक प्रकारांचें प्रदर्शन करण्याच्या जागा, ह्यांचा समावेश होतो. [क. २ (२९)]

**वेळा**—कोणतेंहि थिएटर कोणत्याहि दिवशीं रात्रीं बारा नंतर उघडें ठेवूं नये. [क. २६]

दुकानें उघडीं ठेवण्याच्या ज्या वेळा ह्या कायद्यानें ठरविलेल्या आहेत त्या वेळांव्यतिरिक्त अन्य वेळांत कोणत्याहि थिएटरांत बाहेरच्या गिऱ्हाइकांना कोणताहि माल विकण्यांत येऊं नये. थिएटरच्या आवारांत बसून खाण्यासाठीं वा वापरण्यास खाद्यपेय वा अन्य पदार्थ विकण्यास मात्र हरकत नाहीं. [क. २७]

**कामाचे तास, विश्रांति व विभागणी**—थिएटरमधील कोणाहि नोकरास दर दिवसाला नऊपेक्षां अधिक तास कामावर लावूं नये. निदान एका तासाची तरी विश्रांति दिल्याशिवाय सतत पांचपेक्षां अधिक तास नोकराकडून काम घेऊं नये. ह्यासाठी करावयाच्या कामाच्या तासांच्या विभागणीचा अवधी अकरा तासांपेक्षां अधिक असूं नये. मात्र सरकारला सर्व अथवा विशिष्ट थिएटरांना हा विभागणीचा अवधी विशिष्ट अटींवर वाढवून देतां येईल. [क. २८, २९, ३०,]

**साप्ताहिक भरपगारी सुट्टी**—थिएटरमधील प्रत्येक नोकरास आठवड्यांतून एक दिवस भरपगारी सुट्टी द्यावी. नोकर रोजंदारीवर असेल तर त्याला सुट्टीच्या दिवसाचा पगार मिळावा. सुट्टीच्या दिवशीं नोकराला कोणत्याहि प्रकारें कामाला लावूं नये. मात्र ज्या नोकराचें काम आठवड्यांत सहा दिवसांपेक्षां कमी होत असेल त्याला सुट्टी देण्याचें कारण नाहीं. [क. ३१]

## प्रकरण ६ वें

### मुलें, तरुण व स्त्रिया

वयाच्या बाराव्या वर्षाखालील कोणाहि मुलास कोणत्याहि ठिकाणीं नोकरीवर ठेवावयाचें नाहीं अथवा त्यास कोणतेंहि काम करूं द्यावयाचें नाहीं; मग असें मूल मालकाच्या कुटुंबांतीलहि जरी असलें तरी त्याला काम करण्यास पूर्ण बंदी आहे. [क. ३२]

तरुण म्हणजे ज्याचें वय बारापेक्षां अधिक परंतु सतरापेक्षां कमी आहे असा मनुष्य. [क. २ (३३)]

कोणताहि तरुण मनुष्य अथवा स्त्री ह्यांना कोणत्याहि ठिकाणीं सकाळीं सहाच्या आधीं व सायंकाळीं सात नंतर कामावर ठेवतां येणार नाहीं. असा तरुण अथवा अशी स्त्री मालकाच्या कुटुंबांतील असली तरी त्यांनाहि हा नियम लागू आहे. [क. ३३]

कोणत्याहि तरुणास नोकर म्हणून अथवा अन्य कोणत्याहि प्रकारें दर दिवशीं सहापेक्षां अधिक तास कामास लावता येणार नाहीं, अथवा त्यास काम करूं देता येणार नाहींत. निदान अर्ध्या तासाची तरी विश्रांति दिल्याशिवाय कोणाहि तरुणाकडून सतत तीन तासांपेक्षा अधिक वेळ काम करून घेता येणार नाहीं क. ३४]

## प्रकरण ७ वें

### पगारी रजा व पगारवाढ

**वार्षिक पगारी रजा**—ज्या नोकरांनीं एका वर्षामध्यें निदान २७० दिवस काम केलें आहे अशा नोकरांना पुढील वर्षांत जोडून किंवा तुटकपणानें निदान १४ दिवसांची भरपगारी रजा द्यावी लागेल. ह्या मुदतींत पडलेल्या साप्ताहिक सुट्या चौदा दिवसांतच अंतर्भूत धरल्या जातील. नोकराला ही हक्काची वार्षिक रजा अठ्ठावीस दिवसांपर्यंत सांठवून घेतां येईल. अशा प्रकारें ज्या नोकरास वार्षिक पगारी रजा मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे त्याला जर मालकानें ती रजा दिली नाहीं तर इन्स्पेक्टरकडे तक्रार नोंदविता येईल. ही रजा मिळविण्याचा हक्क प्राप्त झालेल्या नोकरास रजा देण्यापूर्वी कामावरून काढलें अथवा मालकानें रजा दिली नाहीं म्हणून जर नोकरानें काम सोडून दिलें तर वार्षिक रजेच्या चौदा दिवसांचा पगार मालकानें नोकरास द्यावा लागेल. ह्या चौदा दिवसांचा पगार निश्चित करण्यासाठी नोकरानें रजा लागू होण्यापूर्वीच्या तीन महिन्यांत जादा-काम-पगार सोडून जो पगार मिळविला असेल त्याची सरासरी हिशेबांत घेतली जाईल. [क. ३५, ३६]

ज्या नोकरास वार्षिक पगारी रजा मालकानें दिली असेल त्याला ती रजा सुरू होण्यापूर्वी रजेच्या निम्या दिवसांचा पगार आगाऊ द्यावा लागेल. [क. ३७]

**पगारवसुलीसाठी अर्ज**—मालकानें नोकराचा पगार दिला नाहीं तर त्याची वसुली करण्यासाठी पेमेंट ऑफ वेजेज ॲक्ट खालील सोप्या व स्वस्त उपायांची योजना करण्याची सवलत सरकार कामगारांना देऊं शकेल. अशा प्रकारें सरकारनें पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट लागूं असल्याचें जाहीर केल्यास त्या कायद्याखालील इन्स्पेक्टराचे अधिकार ह्या कायद्यान्वयें नेमलेल्या इन्स्पेक्टरांना प्राप्त होतील. [क. ३८]

## प्रकरण ८ वें

### आरोग्य व सुरक्षितता

**स्वच्छता व रंगसफाई**—कोणत्याहि व्यवसायाची जागा स्वच्छ व संडास आणि मोऱ्या यांच्या दुर्गंधीपासून मुक्त ठेवली पाहिजे. [क. ३९] ह्यासाठी व्यवसायांची प्रत्येक जागा–खोल्यांच्या आंतील भिंती, आढीं, छपरें, रस्ते अथवा बोळ आणि जिने ह्यांना दर तीन वर्षांत रंगसफेती केली पाहिजे. तुळया, पटई, दारें, खिडक्या, कठडे ह्यांना दर सात वर्षांत रंग किंवा व्हार्निश लावलें पाहिजे व तीं नेहमीं स्वच्छ ठेवलीं पाहिजेत. ज्या तारखांना रंगसफेती व व्हार्निश केलें असेल त्यांच्या नोंदी 'फॉर्म एफ' मध्यें भरून ठेवून तो फॉर्म इन्स्पेक्टर मागतील तेव्हां त्यांना दाखविला पाहिजे. [नि. ११]

खालील ठिकाणीं रंगसफेती व व्हार्निश केलें नाहीं तरी चालेलः (१) केवळ मालसांठ्यासाठीं वापरल्या जाणाऱ्या खोल्या (२) गॅल्व्हनाइज्ड पत्र्याच्या, टाइल्सच्या, ॲस्बेस्टॉसच्या अथवा अशाच प्रकारच्या पदार्थांच्या अथवा जिल्हईदार विटांच्या भिंती अथवा पट्या (३) सरकारला ज्या ठिकाणीं रंगसफेतीची आवश्यकता भासणार नाहीं अशा अन्य जागा (४) जमिनीसारखी वापरली जाणारी तक्तपोशी [नि. ११]

**कचरा**—व्यवसायाच्या जागेंत किंवा जागेजवळ केरकचरा, राडे-रोडे, दुर्गंधी उत्पन्न होईल असे पदार्थ साठूं देऊं नयेत [नि. १२]

**हवाउजेड**—व्यवसायाच्या जागेंत भरपूर हवाउजेड खेळती राहिली पाहिजे. जर इन्स्पेक्टर यांना एकाद्या व्यवसायाच्या जागेंत पुरेसा उजेड नाहीं असें आढळून आलें तर त्या व्यवसायाच्या मालकास लेखी नोटीस देऊन विशिष्ट मुदतींत जरूर व इष्ट त्या तरतुदी करण्यास इन्स्पेक्टर मालकांना आज्ञा देऊं शकतील. [क. ४१]

**आग**—आगीपासुन संरक्षण व्हावें ह्यासाठी सरकार विशिष्ट व्यवसायांना विशिष्ट तरतुदी करण्यास भाग पाडूं शकेल [क. ४२] कोणत्याहि ज्वालाग्राही पदार्थाजवळ धूम्रपान करण्यास अथवा योग्य संरक्षणाशिवाय विस्तव नेण्यास वा पेटवण्यास मनाई आहे. [नि. १३]

## प्रकरण ९ वें

### अंमलबजावणी व तपासणी

ह्या कायद्याच्या अंमलबजावणीची सर्व कामगिरी, ज्या शहरांना हा कायदा लागू केलेला असेल तेथील म्युनिसिपालिट्या अथवा लोकल बोर्डें ह्यांच्याकडे सोपविलेली असून, त्यांजवर प्रांतिक सरकारची देखरेख मात्र रहाणार आहे. ह्या अंमलबजावणीसाठी नेमावयाचे इन्स्पेक्टर्स म्युनिसिपालिट्यांनींच नेमावयाचे आहेत व एकंदर अंमलबजावणीसाठीं जो खर्च येईल तोहि सर्व प्रकारें म्युनीसिपालिट्यांनींच सोसावयाचा आहे. [क. ४७, ४८]

इन्स्पेक्टरांच्या जबाबदाऱ्या व अधिकार खालीलप्रमाणें आहेत:–

(१) जें ठिकाण एकाद्या व्यवसायाची जागा आहे असें वाटेल त्या ठिकाणीं जरूर तर अन्य कोणा सरकारी अधिकाऱ्याच्या सहाय्यानें कोणत्याहि न्याय्य वेळीं प्रवेश करणें, ह्या कायद्यांतील कलमांना व उद्देशांना धरून जरूर ती जागेची तपासणी, व ह्या कायद्याखालीं ठरविण्यांत आलेल्या नोंदबुकाची, दप्तरांची आणि नोटिसांची पहाणी करणें, आणि ह्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीनें जरूर ते अधिकार चालविणें. मात्र ज्यामुळें स्वतःला एकाद्या गुन्ह्यांत अडकविलें जाण्याचा संभव असेल अशा तऱ्हेचा पुरावा देण्याची सक्ती ह्या कायद्यानें कोणाहि व्यक्तीवर करता येणार नाहीं. [क. ४९]

(२) व्यवसाय ह्या कायद्याखालीं रीतसरपणें नोंदला आहे का नाहीं हें पहाणें.

(३) ठरविण्यांत आलेलीं नोंदबुकें व दप्तरें, नीटपणें ठेवलीं आहेत काय व नोटिसा लावल्या गेल्या आहेत काय हें पाहणें.

(४) कामाचे तास, विश्रांतीच्या वेळा व कामाच्या तासांची विभागणी योग्यप्रकारें होत आहे का हें पाहणें.

(५) उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळा पाळल्या जात आहेत का हें पहाणें.

(६) उपाहारगृहांतील नोकरांना परिचयपत्रिका योग्यपणें दिल्या आहेत काय हें पाहणें.

(७) रजेसंबंधीचे नियम पाळले जात आहेत काय हें पाहणें.

(८) स्वच्छता, हवा, उजेड व आग ह्याबाबत योग्य ती खबरदारी घेतली जात असल्याचें पाहणें.

(९) जादा कामाच्या पगाराची व्यवस्था होत आहे ना हें पाहणें.

(१०) कोणतेंहि अल्पवयी मूल कामाला लावलें जात नाहीं अशी खात्री करून घेणें [नि. १६]

### मालकांनीं ठेवावयाचें दप्तर

प्रत्येक व्यवसायाच्या मालकानें ह्या कायद्याखालील जरूर तें दप्तर नीटपणें ठेवलें पाहिजे व इन्स्पेक्टर ह्यांनीं मागितलें असतां तें त्यांस तपासणीकरितां केव्हांहि दाखविलें पाहिजे [क. ५१]

(१) कामावरील नोकरांच्या कामाच्या तासांची नोंद 'फॉर्म एच' प्रमाणें ठेवावी; जेव्हां सर्व नोकरांच्या काम सुरू व बंद होण्याच्या वेळा सारख्याच असतील तेव्हां कामाच्या तासांची ही नोंद 'फॉर्म आय्' प्रमाणें ठेवावी. अथवा दररोजचे कामाचे तास व विश्रांतीच्या वेळा ह्यांची नोटीस 'फॉर्म जे' प्रमाणें कामाच्या जागीं लावून ठेवावी व प्रत्येक नोकराच्या कामाच्या तासांची नोंद 'फॉर्म के' प्रमाणें ठेवावी. ह्या नोटिशीप्रमाणें ज्या आठवड्यापासून काम सुरू व्हावयाचें असेल त्या आधीच्या शनिवारीं ही नोटीस लावली पाहिजे व तिचा अंमल चालू असेपर्यंत ती लावलेली असली पाहिजे. [नि. १८ (१) (२) (३)]

(२) प्रत्येक उपाहारगृहाच्या, थिएटराच्या, अथवा अन्य करमणूकगृहाच्या मालकानें आपल्या नोकरांना आठवड्यांतील कोणत्या दिवशीं सुट्टी देण्यांत येईल त्याबद्दलची नोटीस 'फॉर्म एल्' प्रमाणें लावावी. ही नोटीस ज्या आठवड्यांत अंमलांत यावयाची त्याच्या आधींच्या शनिवारीं काम बंद होण्यापूर्वी लावावी [नि. १८ (४)]

(३) प्रत्येक मालकानें नोकरांच्या रजांची नोंद 'फॉर्म एम्' प्रमाणें ठेवावी [नि. १८ (५)] व प्रत्येक नोकरास 'फॉर्म एन्' प्रमाणें रजेचें पुस्तक द्यावें. फक्त रजा नोंदण्यापुरतेंच मालकानें तें नोकराकडून घ्यावें व एका आठवड्याच्या आंत नोंदी करून नोकरास परत द्यावें. नोकराचें रजा–पुस्तक हरवल्यास एक आणा किंमत घेऊन त्याला नवें रजा-पुस्तक आपल्या जवळच्या दप्तरावरून सर्व नोंदी करून पुरें करून द्यावें. [नि. १८ (६) (७)]

(४) सरकार ठरवील त्या त्या कायद्याच्या भागांचा उतारा प्रत्येक मालकानें कामाच्या जागीं लावून ठेवावा [नि. १८ (८)]

(५) सर्व नोटिसा नीट दिसतील अशाप्रकारें लावाव्या व खराब झाल्यास बदलून पुनः लावाव्या. [नि १८ (९)]

(६) नोंद पुस्तकांत मालकांनीं करावयाच्या नोंदी ज्या दिवशींच्या त्या दिवशींच कराव्यात. [नि. १८ (१०)]

(७) प्रत्येक वर्षाचें दप्तर पुढील वर्ष संपेपर्यंत सुरक्षित ठेवावें [नि. १८ (११)]

(८) कोणाहि मालकानें अर्ज करून, आपण ठेवीत असलेल्या विशिष्ट प्रकारच्या हजेरी पत्रकावरून, नोंद पुस्तकावरून व दप्तरावरून ह्या कायद्याखालीं जरूर असलेल्या प्रत्येक नोकराबाबतच्या सर्व प्रकारच्या वा कांहीं प्रकारच्या नोंदी स्पष्टपणें व खुलासेवार ठवल्या जात असल्याचें सरकारी अधिकाऱ्यांना दाखवून दिल्यास त्या मालकास त्या सर्व वा कांहीं प्रकारच्या नोंदी त्या विशिष्ट पद्धतीनेंच ठेवावयास सरकार लेखी परवानगी देऊं शकेल. [नि. १८ (१२)]

(९) मालकांनीं ठेवावयाचें दप्तर इंग्रजी भाषेंत किंवा स्थानिक प्रचलित भाषेंत ठेवावयाचें आहे. [नि. १८ (१३)]

(१०) प्रत्येक मालकानें एक 'भेट-पुस्तक' ठेवावें. इन्स्पेक्टर हे आपल्या प्रत्येक भेटीची नोंद त्या पुस्तकांत करतील व जीं कांहीं वैगुण्यें त्यांना दिसून येतील तीं त्या पुस्तकांत नमूद करतील. इन्स्पेक्टरांनीं मागणी केली असतां मालकांनीं हें पुस्तक त्यांना द्यावयाचें आहे. [नि. १८ (१४)]

मालकानें कामावर लावलेल्या कोणाहि नोकराबद्दल मालकाकडून (१) कोणत्याहि शाळेच्या दप्तरावरून दिलेला अधिकृत दाखला. (२) जन्म-नोंदीची सही शिक्क्याची नक्कल. (३) नोंदविलेल्या डाक्टरांनीं दिलेला 'फॉर्म ओ' प्रमाणें वयाचा दाखला इन्स्पेक्टर हे मागवून घेऊं शकतील [नि. १९]

## प्रकरण १० वें

### अपराध व शिक्षा

(१) (अ) व्यवसाय नोंदणीसाठी माहिती; अथवा दिलेल्या माहितींत पडलेल्या फेरफाराची नोटीस; अथवा व्यवसाय बंद केल्याची माहिती योग्य मुदतींत न देणें.

(ब) दुकान, व्यवसाय-केंद्र, वस्तींचें अथवा सार्वे उपाहारगृह, थिएटर अथवा अन्य करमणूकगृह यांच्या सुरू व बंद करण्याच्या कायदेशीर मर्यादा न पाळणें; साप्ताहिक सुट्टी न देणें; दुकानें उघडीं असण्याच्या वेळे व्यतिरिक्त अन्य वेळीं जो माल बाहेरच्या गिऱ्हाइकांना विकावयास परवानगी नाहीं तो उपाहारगृहांत वा थिएटरांत विक्री करणें; स्वच्छता, रंगसफाई व आगीपासून सुरक्षितता ह्याबाबतच्या व्यवस्था न करणें.

(क) दर दिवसाच्या कामाच्या तासांच्या कमाल मर्यादेपेक्षां अधिक काम घेणें; सतत काम करण्याच्या तासांची मर्यादा ओलांडल्यावर द्यावयाची विश्रांति न देतां अधिक वेळ काम करून घेणें व कामाच्या तासांच्या विभागणीसाठी दिलेली वेळेची मर्यादा न पाळणें.

(ड) लहान मूल, तरुण मनुष्य अथवा स्त्री ह्यांजकडून काम करून घेण्याबाबत घातलेल्या निर्बंधांचा भंग करणें.

(ई) कायद्यानें आवश्यक ठरविलेलीं नोंद पुस्तकें वगैरे व्यवसायाचे जागेंत व्यवस्थित न ठेवणें, आणि साप्ताहिक सुट्टीवर अथवा रजेवर असलेल्या कोणाहि नोकरास कामावर ठेवणें अथवा ह्या गोष्टीची माहिती असूनहि त्यास काम करूं देणें.

(फ) ज्याबद्दल अन्यत्र कोठेंच कोणतीहि शिक्षा सांगितलेली नाहीं अशा प्रकारें ह्या कायद्यांतील कोणत्याहि कलमाचा, ह्या कायद्याबाबत केलेल्या नियमांपैकीं कोणत्याहि नियमाचा अथवा ह्या कायद्यासंबंधांतील कोणाहि जबाबदार अधिकाऱ्यानें दिलेल्या कोणत्याहि हुकुमाचा भंग करणें.

हे अपराध केल्याचें सिद्ध झाल्यास, ते करणारे मालक आणि व्यवस्थापक असे दोघेहि दंडास पात्र होतील. दंडाची रक्कम प्रत्येकी पंचवीस रुपयांपेक्षां कमी अथवा अडीचशें रुपयांपेक्षां जास्त असणार नाहीं. [क. ५२]

(२) दुकानें बंद असण्याच्या वेळांत कोणाहि फेरीवाल्यानें मालविक्री केल्यास त्यास दहा ते पन्नास रुपयांपर्यंत दंड करण्यांत येईल. [क. ५३]

(३) साप्ताहिक सुट्टी न दिल्यास अथवा साप्ताहिक सुट्टीवरील कोणाहि नोकरास कामावर लावल्यास अथवा जाणूनबुजून काम करूं दिल्यास रुपये दहा ते पन्नास पर्यंत दंड करण्यांत येईल. [क. ५४]

(४) ह्या कायद्याखाली आवश्यक असलेलें दप्तर ठेवतांना त्यामध्यें कपट वा लबाडी करून फसविण्याच्या हेतूनें जो मालक अथवा व्यवस्थापक खोट्या नोंदी जाणूनबुजून करील; अथवा महत्त्वाच्या नोंदी जाणूनबुजून गाळील, किंवा गाळूं देईल; केवळ स्थळप्रती न ठेवतां त्याशिवाय मुद्दाम दुहेरी दप्तर ठेवील; आणि इन्स्पेक्टरांकडे पाठवावयाचीं माहितीपत्रकें महत्त्वाचे बाबतींत चुकीचीं असलेलीं जाणूनबुजून पाठवील; त्यास पन्नासपासून अडीचशें रुपयांपर्यंत दंड करण्यांत येईल. मात्र मालक व व्यवस्थापक अशा दोघांनाहि ह्या अपराधांबद्दल शिक्षा करावयाची असल्यास त्या दोघांनाहि मिळून केलेल्या दंडाची रक्कम अडीचशें-पेक्षां अधिक असूं नये. [क. (५५)]

(५) वरील प्रकारचे अपराध केल्याबद्दल एकदां शिक्षा झाली असूनहि पुनः त्याच प्रकारचे अपराध केल्यास दुसऱ्या वेळीं ५० ते ५०० रुपयांपर्यंत आणि तिसऱ्या वेळीं ७५ ते ७५० रुपयांपर्यंत दंड करण्यांत येईल. मात्र मालक व व्यवस्थापक ह्या दोघांनाहि त्याच अपराधाबाबत दंड होत असेल तर त्या दोघांच्या मिळून दंडाची रक्कम दुसऱ्या वेळीं ५०० पेक्षां आणि तिसऱ्या वेळीं ७५० पेक्षां अधिक असूं नये; त्याचप्रमाणें वरील प्रमाणें जादा कडक शिक्षा देण्याचे बाबतींत दोन वर्षांपूर्वी झालेले दंड लक्षांत घेण्यांत येणार नाहींत. आणि योग्य प्रसंगीं आपलीं कारणें नमूद करून कोर्टास कमी दंडाची सौम्य शिक्षाहि देतां येईल. [क. ५६]

(६) इन्स्पेक्टर ह्यांस आपलें काम करण्याच्या अथवा अधिकार चालविण्याच्या बाबतींत जो कोणी हेतुपुरस्सर अडथळा आणील वा प्रतिबंध करील किंवा कोणा नोकरास दडवून ठेवून इन्स्पेक्टर ह्यांस त्याची तपासणी व चौकशी किंवा पूसतपास करूं देणार नाहीं त्यांस २५ ते २५० रुपयांपर्यंत दंड करण्यांत येईल. [क. ५७]

**संयुक्त मालकीच्या व्यवसायाबाबतची जबाबदारी**—जेव्हां एकाद्या व्यवसायाची मालकी एकापेक्षां अधिक व्यक्तींकडे असेल तेव्हां त्यांचेपैकीं कोणाहि एकास जबाबदार धरून त्याजवर ह्या कायद्याखालील अपराधांबाबत न्यायकाम चालविलें जाईल व त्यासच शिक्षा केली जाईल. मात्र अशा प्रकारें संयुक्त मालकीचा व्यवसाय असेल तेव्हां इन्स्पेक्टर ह्यांस लेखी नोटीस पाठवून ह्या प्रांताच्या स्थळमर्यादेंत राहणाऱ्या कोणाहि एका मालकास ह्या कायद्याचे अंमलबजावणीबाबत जबाबदार धरण्यांत यावें असें कळवितां येईल. अशी नोटीस रद्द केली नाहीं तोंपर्यंत अथवा ज्याचें नांव नोटिशींत नमूद आहे तो मालक हा प्रांत सोडून गेला नाहीं तों-पर्यंत ह्या कायद्याखालील सर्व जबाबदारी नोटिशींत नमूद असलेल्या मालकावर राहील. [क. ५८]

**कंपनीच्या मालकीचा व्यवसाय**—व्यवसायाची मालकी कंपनीकडे असेल तेव्हां त्याबद्दल कोणाहि डायरेक्टरास आणि कंपनी खाजगी (प्रायव्हेट) लिमिटेड कंपनी असेल तेव्हां तिच्या कोणाहि भागदारास जबाबदार धरण्यांत येईल. मात्र ह्या कायद्याखालील सर्व जबाबदाऱ्या पत्करण्यासाठी इन्स्पेक्टर ह्यांस लेखी नोटीस पाठवून ह्या प्रांतांत राहणाऱ्या कोणाहि एका डायरेक्टराचे अथवा खासगी कंपनीच्या कोणाहि एका भागदाराचें नांव नोंदवून ठेवतां येईल. पुनः नोटीस पाठवून ही नेमणूक रद्द करीपर्यंत अथवा नेमलेले डायरेक्टर अथवा भागदार हा प्रांत सोडून निघून जाईपर्यंत त्यांना मालक म्हणून जबाबदार धरण्यांत येईल. [ क. ५८ ]

**तिऱ्हाइतांच्या अपराधापासून मालकांना व व्यवस्थापकांना संरक्षण**—ह्या कायद्याखालील अपराधाबाबत कोणा मालकावर वा व्यवस्थापकावर खटला चालू झाला असतां त्यांनीं स्वतः तो अपराध केला नसेल तर लेखी तक्रार दाखल करून ज्या तिऱ्हाईत माणसानें तो अपराध केला असेल त्यास त्यांना कोर्टापुढें आणता येईल. त्यानंतर मालकांनीं अथवा व्यवस्थापकांनी असें सिद्ध केलें कीं झालेल्या अपराधाची त्यांना माहिती नव्हती अथवा तो त्यांच्या संमतीनें झालेला नाहीं आणि कायद्यानें घातलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची शक्य ती खबरदारी त्यांनीं स्वतः घेतलेली होती तर कोर्ट त्या मालकास वा व्यवस्थापकास सोडून देऊं शकेल व ज्यानें स्वतः तो अपराध केलेला असेल त्या तिऱ्हाईत माणसाला शिक्षा ठोठावूं शकेल.

त्याचप्रमाणें एखाद्या अपराधाबद्दल प्रत्यक्ष खटला दाखल करण्यापूर्वी जर इन्स्पेक्टर ह्यांची मालकानें अथवा व्यवस्थापकानें अशी खात्री पटवून दिली कीं, झालेला अपराध त्यांनीं योग्य ती खबरदारी घेतली असूनहि घडलेला आहे; तो अपराध करण्याला त्यांची संमति नव्हती; त्यांच्या नकळत तो घडलेला आहे; तर आणि त्यांनीं जर तो अपराध ज्या माणसानें केला त्याचें नांव कळविलें तर त्या तिऱ्हाईत माणसावरच इन्स्पेक्टर हे प्रथमतः खटला भरतील व त्यालाच त्याबद्दल दंड भरावा लागेल. [ क. ५९ ]

**अपराधांची दखल, अधिकारी कोर्ट व कालमर्यादा**—ह्या कायद्याखालील सर्व अपराधांची दखल घेण्याचा अधिकार फक्त इन्स्पेक्टर ह्यांना असून, त्यांनीं खटले भरावयाचे ते प्रांतिक सरकार किंवा स्थानिक म्युनिसिपल अधिकारी ह्यांच्या आगाऊ संमतीशिवाय भरावयाचे नाहींत. खटले ऐकण्याचा अधिकार मुंबईत प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट व अन्यत्र सेकंड क्लास मॅजिस्ट्रेट ह्यांच्यापेक्षां कमी दर्जाच्या कोर्टास नाहीं. जो अपराध घडल्यापासून सहा महिन्यांच्या आंत त्याची रीतसर फिर्याद दाखल केली गेलेली नसेल त्याची दखल कोणाहि कोर्टास घेता येणार नाहीं. [ क. ६०, ६१ ]

## प्रकरण ११ वें

### संकीर्ण व पूरक विषय

ह्या कायद्याखालीं ठेवावयाचें सर्व दप्तर व लावावयाच्या नोटिसा ह्या व्यवसायाच्या जागेंतच ठेवावयास व लावावयास पाहिजेत. [ क. ६२ ]

### जादा कामाचा पगार

(१) थिएटरांतील अथवा करमणूकगृहांतील नोकरांकडून दर रविवारीं नऊ तासांपेक्षा आणि दुकानांतील अथवा व्यवसाय-केंद्रांतील नोकरांकडून दर दिवशीं नऊ तासांपेक्षां अथवा दर आठवड्यांत अठ्ठेचाळीस तासांपेक्षां अधिक काम घेणें असेल तर त्या जादा कामाची मजुरी नेहमींच्या कामाच्या मजुरीच्या दीडपट दरानें द्यावी लागेल.

(२) कोणत्याहि उपाहारगृहांतील नोकराकडून दर दिवशीं नऊ तासांपेक्षां अधिक काम घेणें असेल, तर त्या जादा कामाची मजुरी नेहमींच्या कामाच्या मजुरीच्या दुप्पट दरानें द्यावी लागेल.

(३) ह्या व्यतिरिक्त अन्य व्यवसायांतील नोकरांची जादा कामाची मजुरी सरकार ठरवील त्या दरानें द्यावी लागेल [ क. ६३ ]

**वयाचा दाखला**—नोकरांच्या वयाबाबत योग्य तो पुरावा दाखल करण्याची जबाबदारी मालकांवर राहील. ह्या कामी नोंदलेल्या डॉक्टरांचे दाखले प्रमाण धरले जाऊं शकतील. [ क. ६४ ]

**दुहेरी कामास बंदी**—ह्या कायद्यानें दिलेल्या सुट्टीच्या अथवा रजेच्या दिवशीं कोणाहि नोकरानें कोणत्याहि ठिकाणीं काम करूं नये; आणि अशा नोकरास कोणाहि मालकानें अशा दिवशीं जाणून बुजून काम करूं देऊं नये. [ क. ६५ ]

**कामावरून काढण्याबद्दल नोटीस**—कमीत कमी तीन महिने सतत कामावर असलेल्या कोणाहि नोकरास निदान चौदा दिवसांची आगाऊ नोटीस अथवा नोटिशीच्या चौदा दिवसांचा पूर्ण पगार दिल्याशिवाय कोणाहि मालकानें कामावरून काढून टाकूं नये. मात्र नोकरास दुर्वर्तनासाठीं कमी केला असेल तर नोटीस देण्याची आवश्यकता नाहीं. [ क. ६६ ]

**अधिकाऱ्यांना संरक्षण**—ह्या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत जें कोणतेंहि काम अधिकाऱ्यांनीं प्रामाणिकपणानें केलेलें असेल त्याबद्दल त्यांजवर व्यक्तिशः कोणतेंहि दिवाणी अगर फौजदारी काम चालवितां येणार नाहीं. [ क. ६८ ]

**नोकरांचे जादा हक्क अबाधित**—हा कायदा अंमलांत येण्यापूर्वी कोणत्याहि अन्य कायद्याखालीं, करारान्वयें, रूढीनें अथवा पद्धतीमुळें अथवा लवाद निवाड्यामुळें कोणत्याहि विशिष्ट व्यवसायांतील कोणाहि नोकरांना जे कांहीं जादा हक्क, अधिकार अथवा सवलती मिळालेल्या असतील त्यांना कोणत्याहि प्रकारें बाध येणार नाहीं. [ क. ६९ ]

कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांना हा कायदा लागू नाहीं. [ क. ७० ] त्यांचेसाठीं फॅक्टरीज् अॅक्ट केलेला आहे.

**वार्षिक अहवालः**—ह्या कायद्याच्या अंमलबजावणीचें वार्षिक अहवाल वर्ष संपल्यापासून तीन महिन्यांचे आंत म्युनिसिपॉलिट्यांनीं सरकारला सादर करावयाचे आहेत. [ क. ७१ ]

**जुना कायदा रद्द होणार**—हा कायदा अंमलांत येईल त्या तारखेपासून जुना कायदा रद्द होईल. परंतु त्या कायद्याखालीं ज्या नेमणुका, हुकूम, नियम वगैरे केलेले असतील ते मात्र ह्या कायद्याखालील योग्य त्या तत्संबंधीच्या योजना होईपर्यंत अंमलांत राहतील. त्याचप्रमाणें जुन्या कायद्याखाली जे खटले वगैरे भरलेले असतील त्यांचेहि कामास जुना कायदा रद्द झाल्यामुळें कोणताहि बाध येणार नाहीं. [ क. ७२ ]

### सवलती व अपवाद

(अ) दुकानें उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळा [ क. १०, ११ ] व्यवसाय-केंद्रें उघडण्याच्या वेळा [ क. १३ ] कामाचे तास, विश्रांतीच्या वेळा, विभागणीचा अवधी व साप्ताहिक सुट्ट्या [ क. १४ ते १८ ] ह्या संबंधींच्या ह्या कायद्यांतील मर्यादा खालील ठिकाणच्या नोकरांना लागू नाहींत.

(१) फक्त मालाची पाठवणी व उठाव रेल्वेनें अथवा इतर अन्य वाहनांनीं करण्याच्या कामावर व जकात भरण्याबाबतच्या व्यवस्था करण्याच्या कामावर नेमलेले वाहतुक-व्यवसायांतील कारकुनी नोकर.

(२) फक्त माल आणण्या-नेण्यासाठी, जमा करण्यासाठी व वाहण्यासाठी व्यवसायाच्या जागेबाहेर लावलेले नोकर.

(३) सरकारनें मान्यता दिलेल्या औषधाच्या केमिस्टस् व ड्रगिस्ट् ह्यांच्या दुकानांतील नोकर.

(४) आजारी, अपंग, अनाथ व वेड्या लोकांना संभाळण्यासाठी नेमलेले नोकर.

(५) केवळ बर्फ, वायुमिश्रित (एअरेटेड वॉटर्स) पेयें आणि मार्तिकाचें सामान विकण्याच्या दुकानांतील नोकर.

(६) ज्याचें काम स्वभावतः खंडित (इन्हीरंटली इन्टरमिटंट) असल्याचें सरकारनें जाहीर केलें आहे असे प्रवासी, प्रचारक, वगैरे नोकर. [शिड्यूल्ड II (II) ७, ८, ९, १०, ११, १२.]

(ब) रेल्वे स्टेशन्स, बंदरें आणि विमानतळ ह्यांच्या जागेंतील उपाहारगृहांना उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळांचें [क. १९] बंधन लागू नाहीं. [शिड्यूल्ड II (II) १३]

(क) पहारेकरी, रखवालदार व निरोपे ह्यांचे बाबतींत दुकानें, व्यवसायकेंद्रें, उपाहारगृहें, थिएटर्स व करमणुकगृहें ह्यांतील काम सुरू व बंद करण्याबाबतची, कामाच्या तासांची व विभागणीची व साप्ताहिक सुट्ट्यांबाबतची [क. १०, ११, १३ ते १९; २२ ते २४; २६, २८, ते ३१] बंधनें लागू नाहींत. [शिड्यूल II (II) १४]

(ड) मालकाच्या कुटुंबांतील कोणीहि व्यक्ती म्हणजे स्वतः मालक पतिपत्नी, मालकाचा मुलगा अथवा मुलगी, वडील, आई, भाऊ किंवा बहीण—मालकाच्या घरीं व त्याजवर अवलंबून रहाणारीं असतील [क. २ (१७) त्याजवर दुकानांतील, व्यवसाय केंद्रांतील, उपाहारगृहांतील अथवा थिएटरांतील कामाचे तास, विश्रांतीच्या वेळा, विभागणीचा अवधी व साप्ताहिक सुट्ट्या [क. १४ ते १७; २१ ते २४; २८ ते ३१] ह्याबाबतची बंधनें लागू नाहींत. [शिड्यूल II (II) १५]

(इ) त्याचप्रमाणें गुप्त विश्वासाच्या व व्यवस्थापकांच्या जागेवर नेमलेल्या नोकरांवरही वरील (ड) मधील बंधनें लागू नाहींत. मात्र कोणत्याहि व्यवसायांत नेमलेल्या अशा विश्वासाच्या नोकरांची संख्या एकूण नोकरांच्या संख्येच्या एकदशांशापेक्षां जास्त असतां कामा नये. पण हें प्रमाण काढतांना अपूर्णांक आल्यास तर त्याबद्दल पुढील पूर्ण अंक धरावयास हरकत नाहीं. [शिड्यूल II (II) १६]

## विविध माहिती

**मुसलमान राष्ट्रांची आर्थिक संघटना**—येत्या नोव्हेंबर महिन्यांत मुसलमानी धर्माच्या राष्ट्रांची एक आर्थिक परिषद् करावीला भरविण्याचें घाटत आहे. मुसलमानी राष्ट्रांचे आर्थिक व्यवहार एकमेकांशीं जुळते करून त्यांना योजनाबद्ध स्वरूप देण्याचा प्रयत्न परिषदेंत करण्यांत येणार आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील राष्ट्रें आर्थिक बाबतींत एकमेकांना जशा सवलती देतात त्याचप्रमाणें मुसलमानी राष्ट्रांनीं परस्परांना सवलती देण्याबद्दलही परिषदेंत विचार होणार आहे.

**त्रावणकोरमधील काथ्याचा धंदा**—त्रावणकोर संस्थानांतील काथ्याच्या सामानाच्या धंद्याला युद्धांत चांगली तेजी आली होती. १९४५ सालीं त्रावणकोरमधून ६ कोटी रुपयांचा माल निर्यात झाला होता. युद्ध संपल्यानंतर काथ्याच्या चटयांची मागणी एकदम कमी झाली आणि संस्थानांतील ४०० कारखाने बंद पडून ३०,००० कामगार बेकार झाले. युद्धानंतर ब्रिटन, बेल्जम आणि हॉलंड ह्यांनीं काथ्याचा दोऱ्या मागवून स्वतःच चटया करण्यास प्रारंभ केला; त्यामुळें ही मंदी आली आहे. त्रावणकोरचे सरकार आतां तागाच्या पोत्याऐवजीं काथ्याचीं पोतीं करता येतील किंवा काय, हें पहात आहे.

**उदयशंकरच्या नृत्याचा बोलपट**—सुप्रसिद्ध हिंदी नृत्यपटु श्री. उदयशंकर हे सध्या लंडनला गेले आहेत. आपल्या नृत्याचे तंत्र दर्शविणारा १०,००० फूट लांबीचा चित्रपट ते लंडन येथें दाखविणार आहेत. श्री. उदयशंकर लंडनला चित्रकलेचे विद्यार्थी म्हणून राहात असतांना जगप्रसिद्ध रशिअन नर्तिका ॲना पॅव्हलोव्हा ह्यांनीं त्यांचें मन नृत्याकडे वळविलें. तेव्हांपासून त्यांनीं चित्रकलेचा नाद सोडून दिला.

**इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण**—इंपीरिअल बँकेच्या नोकरसंघाच्या मध्यवर्ती संघटनेच्या चिटणिसांनीं एक पत्रक काढून, प्रो. के. टी. शहा, श्री.टी. कृष्णम्माचारी इत्यादींच्या बँकेच्या राष्ट्रीयीकरणाच्या सूचनेला पाठिंबा दिला आहे. इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण झालें तर सरकारला युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनांसाठीं भरपूर पैसा मिळेल, असें पत्रकांत म्हटलें आहे. त्याशिवाय पतीच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवून चलनवृद्धीला विरोध करण्यांत सरकारला मदत होईल, असेंही सुचविण्यांत आलें आहे.

**अमेरिकेचीं बिनपंखाचीं विमानें**—कर्टिस राइट कॉर्पोरेशन ह्या अमेरिकन विमान कंपनीच्या अध्यक्षांनीं रशिआच्या बिनपंखाच्या विमान-निर्मितीविषयीं आपणास नक्की कांहीं माहिती नाहीं असें सांगितलें. तथापि, ब्रिटन आणि इतर राष्ट्रांच्या मानानें अमेरिकेचीं ह्या पद्धतीचीं विमानें मागासलेलीं आहेत, कारण अमेरिकन सरकारनें जरूर त्या संशोधनासाठी पैसा पुरविला नाहीं, असें मात्र त्यांनीं जाहीर केलें.

**फ्लॉरेन्स नाइटिंगेल ग्राम-स्वच्छता फंड**—खेडेगांवांतील स्वच्छतेच्या संवर्धनासाठी वरील फंडांतून प्रत्येक गांवाला जास्तींत जास्त १५० रुपये वार्षिक मदत म्हणून देण्यांत येत असते. ज्या ग्रामीण संस्था खेडेगांवांतील स्वच्छतेविषयक कार्य करीत असतील आणि ज्यांना आर्थिक साह्याची गरज भासत असेल, त्यांनीं आपल्या कार्याचे अहवाल सोशल सर्व्हिस लीग, मुंबई नं. ४, ह्या संस्थेकडे पाठवावे आणि मदत मिळण्याविषयींच्या अर्जाचे नमुने मागवून घ्यावे.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.